*कष्टकरी जनता, भूषण भारता । वंदन करितो पददलिता ।।*

**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे नियतकालिक**

**संपादक**
**रामचंद्र मुटाटकर**

# हाकारा (त्रैमासिक)

**कार्यकारी संपादक**
**ग. शां. पंडित**

**वर्ष : २९ वे** **जानेवारी–मार्च २००८** **अंक : पहिला**

# अनुक्रमणिका


संपादकीय ---------------------------------------------------- २

१. मिझोराम : निसर्ग व टेकड्यांनी समृध्द राज्य : डॉ. शौनक कुलकर्णी ------------ ५

२. मिझोराममधील लोकजीवन व संस्कृती : कु. चारुलता दत्तात्रय नांद्रे ------------- ७

३. मिझोरामची नृत्यकला : कु. चारुलता दत्तात्रय नांद्रे --------------------- १२

४. मिझोराममधील लोकांची भौतिक संस्कृती : जुई धालेवाडीकर ---------------- १५

५. मिझोरामचे मुख्यमंत्री : बीज भाषण ---------------------------------- २३

६. मिझोरामचा विकास : एक दृष्टीकोन --------------------------------- २७

७. माझा मिझोरामकडे प्रवास :सोनाली मुटाटकर -------------------------- ३४

८. उत्तर पूर्व भारतातील ग्रामीण विकास कार्यक्रम ------------------------ ३७

९. मिझोरामचे बांबू विकास धोरण ------------------------------------ ४२



- **पत्रव्यवहाराचा पत्ता**
  महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
  ६४, आनंद पार्क, औंध,
  पुणे – ४११ ००७.
  टेलिफॅक्स (०२०)२५८९७२९८

**अंक मूल्य ४०/– रूपये**

- **अक्षर जुळणी**
  नंदू हि. दिघे
- **मुद्रण स्थळ**
  ओम एंटरप्राईजेस, पुणे
- **इतर छायाचित्रे**
  संस्थेच्या छायाचित्र संग्रहातून
- **मुद्रक व प्रकाशक**
  रा. के. मुटाटकर
  अध्यक्ष, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
- **मुखपृष्ठ छायाचित्र**
  'जेटविंग्ज' या इंग्रजी मॅगझिनच्या नोव्हेंबर २००५ च्या अंकातून साभार



**या अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.**

या अंकास महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने अनुदान दिले असले तरी अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

संपादकीय

# निसर्गरम्य 'मिझोराम'चा रोचक इतिहास

ईशान्य भारतातील मिझोराम आदिवासी राज्य म्यानमार (ब्रह्मदेश) व बांगला देश अशा दोन राष्ट्रांशी समांतर सीमेवर असणारे राज्य आहे. त्यामुळे राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने मिझोरामचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. मिझोरामचा निसर्ग रम्य व इतिहास रोचक आहे. बंगालच्या उपसागरावरील चितगांव हे बंदर इतिहासकालीन महत्त्वाचे बंदर आहे. चितगांव येथे चाचे, पोर्चुगीज व पळून गेलेले गुलाम यांची वर्दळ होती. छोट्या छोट्या बोटीतून हे लोक नद्यांतून बाजाराच्या दिवशी किंवा विवाह प्रसंगी, सणावाराच्या निमित्ताने जमलेल्या लोकांवर हल्ले करुन लूटमार करून लोकांना गुलाम करण्याकरिता पळवून न्यावयाचे. औरंगजेब बादशाहने १६६४ साली बंगालचा शासक शैस्ताखान याला बोटी व १३०० सैन्याच्या मदतीने चितगांव ताब्यात घेतले व चाच्यांचा बिमोड केला. १७६० साली मीर कासीमने ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकारात चितगांव आणले. १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामात ३४ व्या पायदळ सेनेतील तीन कंपन्यांच्या शिपायांनी बंड केले व ते खजिना लुटून डोंगरात पळून गेले; परंतु लगेच पकडले गेले.

सर्व आदिवासींप्रमाणेच मिझो प्रदेशातील आदिवासी स्वतंत्र वृत्तीचे होते व त्यांच्या जंगलस्वातंत्र्यावर गदा आणणाऱ्या ब्रिटीशांच्या चहाच्या मळ्यांच्या विस्तारावर त्यांनी अनेकदा हल्ले केले. १८७१-७२ या काळातील ब्रिटीशांबरोबर चकमकींचे वृत्तांत प्रसिद्ध आहेत. या सर्व प्रदेशात आदिवासी जमातींचे राजे (चीफटेन) राज्य करीत. ब्रिटीशांनी त्यांच्यावर आधिपत्य केले. त्यांचे अधिकार कमी करण्यात आले. १८९५ साली मिशनऱ्यांनी पहिली शाळा काढली व लुशाई बोलीभाषा रोमनलिपीत लिहिण्याची सुरूवात केली. १९३५ च्या भारत सरकारच्या कायद्याअन्वये (Government of India Act 1935) लुशाई हिल्सचा प्रदेश (मिझोराम) आसामच्या ब्रिटीश गव्हर्नरच्या थेट आधिपत्याखाली वर्ग करण्यात आला. प्रांतीय शासनाच्या व कायदेमंडळाच्या अखत्यारीतून त्यास अलग करण्यात आले.

मिझोराममधील बांबूचा फुलोरा व त्याच्याशी निगडित उंदरांची भरमसाट पैदास आणि त्यांनी फस्त केलेल्या पिकांमुळे 'मौतम' दुष्काळ या दुष्टचक्राशी मिझोरामचे राजकारण, मिझोरामची स्वतंत्र राज्य म्हणून

निर्मिती निगडित आहे. याबाबतची माहिती अंकातील लेखांमध्ये आली आहे. इंदिरा गांधींच्या राजवटीत भारतीय सुरक्षिततेच्या भूमिकेतून, मिझोराममधील गावांची पुनर्रचना करण्यात आली व सर्व गावे जंगलातून हलवून राष्ट्रीय हमरस्त्याच्या कडेला पुनर्वसित करण्यात आली. छोटे राज्य, शिक्षणाचे प्रमाण जवळजवळ १०० टक्के, सगळी लोकसंख्या ख्रिश्चन यामुळे शासकीय नोकऱ्या मिळतात. ख्रिश्चन धर्माच्या दबावामुळे दारु व्यसनाचे प्रमाण खूपच कमी आहे. रस्त्याच्या कडेला असलेल्या गावांमुळे प्रवास करताना, विशेषत: रविवारी, सगळ्या लोकांनी धुतलेल्या कपड्यांचे प्रदर्शन दोरींवर वाळत असलेल्या कपड्यांचे निदर्शनास येते. तसेच अन्न म्हणून पाळलेल्या डुकरांचेही दर्शन होते.

मला २००६ ची दिवाळी दक्षिण मिझोरामची राजधानी 'लुंगले' या शहरी घालविण्याची संधी मिळाली. लुंगले येथील भाजी मंडई, इतर बाजार, मिझोंचे प्रसिद्ध बांबू नृत्य व चर्च बघावयास मिळाले. ज्येष्ठ नागरिकांच्या घरी जाऊन त्यांच्या लहानपणाबद्दल चर्चा झाल्या. शिलाँग येथे शाळेत जाण्यासाठी ते ढाक्याहून जात असत. पूर्वजांचे वीरस्तंभ इतर आदिवासी समाजांप्रमाणे जागोजागी पाहावयास मिळतात. भारतीय सैन्यदलाने त्यांची डागडुगी केल्यामुळे पूर्वीच्या सैन्यदलाबद्दलचा कडवटपणा नाहीसा झालेला दिसला. तेथील वास्तव्यात मिझोरामचे राज्यपाल मा. ले. ज. (निवृत्त) लखेरा यांच्याशी दूरध्वनीवरुन संवाद साधण्याची संधी मिळाली. जनरल लखेरांकडे काही काळ अंदमान-निकोबारच्या नायब राज्यपालपदाची अतिरिक्त जबाबदारीही होती.

अंदमानचे आदिवासी जगातील सर्वात पुरातन व इतरांशी न मिसळणारे समजले जातात. त्यांची लोकसंख्या कमी होत असल्याने त्यांची जमात नामशेष होईल की काय अशी चिंता असते. त्यांचे निसर्गाशी अटूट नाते असल्याने, 'सुनामी'च्या लाटांपासून ते बचाव करू शकले. मनुष्यहानी मुळीच झाली नाही, असे राज्यपालांनी सांगितले. अंदमान भारताच्या मुख्य भूमीपेक्षा ऑस्ट्रेलियाला जवळ आहे. अंदमान सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचे बेट आहे. तेथे भारताच्या मानव सर्वेक्षण विभागाचे कार्यालय आहे. (एन्थ्रॉपॉलॉजिकल सर्वे ऑफ इंडिया). आंतरराष्ट्रीय दर्जाचे रस्ते बांधण्यास मानव सर्वेक्षण विभागाचा विरोध आहे, असे मा. राज्यपालांनी सांगितले. त्यावर सर्वेक्षण विभागास अंमलबजावणी किंवा धोरणात्मक निर्णय घेण्याचे अधिकार नाहीत हे मी त्यांच्या निदर्शनास आणून दिले. बोलण्याच्या ओघात मी त्यांना महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद व मानवशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे विद्यापीठ येथे २१-२३ फेब्रुवारी २००७ रोजी भारतीय मानवशास्त्र परिषद भरणार आहे, त्याचे उद्‌घाटन त्यांच्या हस्ते व्हावे असे आमंत्रणही दिले.

त्यांनी ते आनंदाने मान्य केले. या परिषदेत भारताचे सर्व ज्येष्ठ मानवशास्त्रज्ञ येतील त्यावेळी समोरा-समोर अंदमानच्या चर्चेचे एक विशेष सत्र ठेवता येईल हेही त्यांना सांगितले. त्याप्रमाणे ते आले. त्यांनी उद्घाटन केले व अंदमानविषयक सत्राचे अध्यक्षपदही स्वीकारले. या परिषदेला मिझोरामला राज्याचा स्वतंत्र दर्जा देण्याबाबतच्या करारावर स्वाक्षरी करणारे त्यावेळचे भारताचे गृहसचिव श्री राम प्रधानही दिवसभर उपस्थित राहिले.

काही वर्षांपूर्वी हाकाराचे दोन विशेष अंक नागालँडबाबत प्रकाशित केले होते. ईशान्येकडील आदिवासी राज्य 'मिझोराम'चा हा विशेष अंक प्रकाशित करण्यास आम्हास आनंद होत आहे. महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेच्या विनंतीस मान देऊन मा. राज्यपाल जनरल लखेरा यांनी भारतीय मानव विज्ञान परिषदेचे उद्घाटन केले व श्री राम प्रधान त्यास आवर्जून उपस्थित राहिले याबद्दल त्यांचे विशेष आभार. अशा मान्यवरांच्या सहकार्यामुळे व प्रेमामुळे आम्हास आदिवासीविषयक कार्य करण्यास बळ मिळते.

ऐझोल येथील आदिवासी संशोधन संस्थेने ब्रिटीश काळातील मिझोरामविषयी दुर्मिळ ग्रंथांचे पुन:प्रकाशन केले ही वाखाणण्यासारवी बाब आहे. याची पुनरावृत्ती महाराष्ट्रातही व्हावयास हवी. या ग्रंथांच्या आधारे लेखकांनी डॉ. शौनक कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली लेख लिहिले त्यांचे सादर आभार. तसेच या अंकातील इंग्रजी लेखांचा मराठी अनुवाद करण्यास डॉ. शैलेश दळवी व सुशिल कहात यांनी कुठलेही आढेवेढे घेतले नाहीत, याबद्दल त्यांचेही मन:पूर्वक धन्यवाद. अंकाबाबत प्रतिक्रिया कळवाव्यात ही विनंती.

**रा. के. मुटाटकर**
**संपादक**

# मिझोरम : निसर्ग व टेकड्यांनी समृध्द राज्य

**डॉ. शौनक कुलकर्णी, पुणे**

निसर्ग सौंदर्याने परिपूर्ण आणि पहाडी टेकड्यांनी समृध्द असलेला ईशान्य भारतातील मिझोराम हा भाग भारताचे २३ वे राज्य म्हणून फेब्रुवारी १९८७ मध्ये अस्तित्वात आले. तत्पूर्वी आसाम राज्यातील एक जिल्हा आणि केंद्रशासित प्रदेश असेच त्याचे अस्तित्व होते. नैसर्गिक सौंदर्याबरोबरच मुक्त जीवन जगणारे आदिवासी या राज्यात मोठ्या संख्येने आहेत.

नैऋत्य भागातील बहुतेक सर्वच जमातींप्रमाणे मिझो लोकांची उत्पत्ती अथवा त्यांचे मूळ हे एक गूढ आहे. चीनमधील मंगोलॉईड वंशाच्या लोकांच्या स्थलांतराचा तो एक भाग असावा असे मानले जाते. चीनमधील या लुंगू नदीच्या खोऱ्यातील शिनलंग येथून मिझो आले असा एक समज आहे. हे स्थलांतर सुध्दा शान प्रांत कबाव व्हॅली खांदर मार्गे आले असावे असे मानण्यात येते.

सुरुवातीला याच मिझांना 'कुकी' असे म्हटले गेले. यानंतर आलेल्या स्थलांतरीतांना नवकुकी असे संबोधण्यात आले. आजही ईशान्य भारतात कुकी आदिवासी जमात आहे. लुशैज ही स्थलांतरीतांमध्ये आलेली शेवटची जमात मानण्यात येते. १८ व्या १९ व्या शतकातील मिझोंचा इतिहास हा आदिवासींचाच इतिहास म्हणून ओळखला जातो.

१८९५ मध्ये मिझो टेकड्यांचा भाग हा भारताचा ब्रिटिश राजवटीखालील भाग म्हणून घोषित झाला. लुशाई टेकड्यांच्या भागातील मिझो नागरिकांनी मिझो कॉमन पिपल्स युनियन एप्रिल १९४६ मध्ये स्थापन केली. याच संघटनेचे नाव पुढे मिझो युनियन असे करण्यात आले. लुशाई टेकड्यांचा भाग ब्रह्मदेशात सामील व्हावा अशी त्यांची प्राथमिक मागणी होती. १९५२ मध्ये लुशाई टेकड्या या आसामातील स्वायत्त जिल्हा म्हणून उदयास आला. त्रिपुरा आणि मणिपूर मधील मिझो लोकांच्या वर्चस्वामुळे १९५४ मध्ये राज्य पुन: संघटन आयोगाची स्थापना करण्यात आली. या आयोगात सुचविलेल्या सूचनांवरुन आदिवासी नेते आणि कार्यकर्ते नाराज झाले, त्यामुळे १९५५ मध्ये त्यांनी ईस्टर्न इंडिया युनियन हा पक्ष स्थापन केला. या पक्षाने आसामच्या टेकड्यांच्या भागात नविन राज्य निर्माण करण्याची मागणी केली.

१९५९ मध्ये मिझो टेकड्यांचा परिसर हा अन्नटंचाईमुळे मोठ्या प्रमाणावर उद्ध्वस्त झाला. वास्तविक याचे कारण बांबूच्या फुलव्याशी होते. बांबूच्या फुलव्यांमुळे मोठ्या प्रमाणावर उंदरांची पैदास झाली. बांबूच्या बिया फस्त केल्यावर उंदरांनी आपला मोर्चा शेतातील पिकांकडे वळविला. त्यामुळे शेतातील पिके आणि धान्याची मोठ्या प्रमाणावर नासाडी झाल्याने अन्नटंचाई तर झालीच, शिवाय स्थानिक अर्थव्यवस्थेलाही फटका बसला. उंदरांपासून झालेला उपद्रव हा इतका भयंकर होता की गावकऱ्यांना उदर निर्वाहासाठी जंगल संपत्ती गोळा करण्यासाठी जंगलात जावे लागले. एकूण अन्नधान्याची परिस्थिती बिकट झाल्याने उपासमार झाली. काही भुकबळी पडले.

याची नोंद घेत बऱ्याच संस्था संघटनांनी ग्रामस्थांच्या मदतीसाठी हात पुढे केला.

१९५५ मध्ये नविन राज्य निर्मितीच्या वेळेसच मिझो सांस्कृतिक संस्था स्थापन करण्यात आली होती. लालडेंगा या संस्थेचे सचिव होते. १९६० मध्ये ही संस्था मौतम फ्रंट  या नावाने नामांतरित करण्यात आली. १९५९ च्या अन्नटंचाईच्या वेळी या संस्थेने मदतनिधी आणि सहायता कक्ष उभारुन समाजातील विविध वर्गांचे लक्ष आपल्याकडे वळवून सहानुभूती मिळविली होती. १९६० मध्ये या संस्थेने मिझो नॅशनल फेमाईन फ्रंट असे नाव घेतले. या संस्थेने आपल्या कामामुळे समाजाच्या विविध थरात अमाप प्रसिध्दी मिळविली होती. तांदूळ वाहून नेणे, जीवनावश्यक वस्तूंर्चा ने आण करणे यासारख्या कामात असंख्य मिझो तरुण सहभागी झाल्याने कामाला व्यापकत्व मिळाले. समाजात तळागाळापासून ही संस्था माहीत झाली.

१९६१ मध्ये या संस्थेने फेमाईन हा शब्द वगळून फक्त 'मिझो नॅशनल फ्रंट' असे नाव धारण केले. या संस्थेचे नेतृत्वही लाल डेंगा यांचेकडेच होते. यांचे मुख्य ध्येय 'मिझो लोकांसाठी संपूर्ण सार्वभौमत्व, हक्काचे राज्य' असे होते. आसाम पहाडी प्रदेशातील छोटे मोठे राजकीय गट स्वतंत्र राज्यासाठी झगडत होते. यामुळे १९६७ साली मिझो नॅशनल फ्रंटवर काही प्रमाणात बंधने आली. असे असूनही नविन राज्याच्या मागणीसाठी नव्याने जोर धरला.

१९७१ मध्ये मिझो शिष्टमंडळाने तत्कालिन पंतप्रधान इंदिरा गांधी यांना भेटून स्वतंत्र राज्याची मागणी केली. मात्र त्यावेळी स्वतंत्र राज्याऐवजी केंद्रशासित प्रदेश म्हणून मान्यता देण्यात आली. लोकसभेत एक आणि राज्यसभेत एक अशा दोन जागा मिझोरामसाठी देण्यात आल्या.

यानंतर राजीव गांधी पंतप्रधान झाल्यावर स्वतंत्र राज्य करण्याच्या दृष्टीने पुनश्च प्रयत्न करण्यात आले. यादृष्टीने प्रयत्न करताना ५ ऑगस्ट १९८६ मध्ये मिझोरामला राज्याचा दर्जा देण्याचे बिल लोकसभेत मंजूर करण्यात आले. २०/२/१९८७ रोजी मिझोराम स्वतंत्र राज्य म्हणून अस्तित्वात आले. हितेश्वर सैकिया राज्याचे पहिले राज्यपाल झाले.

मिझोराम राज्याचा एकूण प्रवास अशाप्रकारे झाला आहे. प्रामुख्याने भात पिकविणारे हे राज्य निसर्गसौंदर्याने समृध्द आहे आणि साहजिकच पर्यटनासाठीही येथे मोठा वाव आहे. पर्यटकांच्या आकर्षणाचे आणि त्यांनी आवर्जून भेट द्यावी अशी काही ठिकाणी आहेत. याप्रमाणे ब्ल्यू माऊंटन हे सर्वाधिक उंचीवरील ठिकाण चिमडुईफुई जिल्ह्यात कोल्डाईन नदीवर असून मिझोराम म्यानमार सीमेजवळ आहे. २१५७ मीटर उंचीवरील हे ठिकाण सर्व बाजूने बांबूने वेढले आहे. अनेकविध दुर्मिळ प्राणी आणि वनस्पती या भागात आहेत.

• • •

# मिझोराममधील लोकजीवन व संस्कृती

**कु. चारुलता दत्तात्रय नांद्रे**
पुणे विद्यापीठ

**भौगोलिक**

पर्वतराजीने नटलेले नयनरम्य 'मिझोराम' हे राज्य १९७२ सालापर्यंत आसाम राज्याचाच एक जिल्हा म्हणून ओळखला जात असे. हा भाग पूर्वी 'लुशैम हिल्स' म्हणून ओळखला जात असे. 'लुशैम' हे नाव मिझोराममधील प्रमुख कुल 'लुसै' या नावावरुन पडले आहे, असे मानले जाते. पूर्व आणि दक्षिण दिशेकडून बांगलादेश आणि म्यानमार या आंतराष्ट्रीय सरहद्दीमुळे मिझोरामला लष्करीदृष्ट्या उत्तरपूर्व भारतामध्ये अतिशय महत्त्व आहे. म्यानमार आणि बांगलादेश यांच्याशी संलग्न अशी सुमारे ७२२ कि. मी. ची ताबारेषा मिझोरामला लाभली आहे.

'मिझोराम' पूर्व भारतातील अतिशय नयनरम्य आणि जास्तीत जास्त डोंगराळ प्रदेशांनीयुक्त राज्य आहे. उंच आणि अतिशय सरळ असणाऱ्या पर्वतांना दक्षिण आणि उत्तर दिशांना वाहणाऱ्या नद्यांनी अनेक खिंडी पाडून वेगळे केले आहे. येथील शिखरांची सरासरी उंची १००० मीटरपर्यंत असून 'फवंगपई' (Blue mountain) ची उंची सर्वांत जास्त म्हणजे २२१० मीटर इतकी आहे. मिझोरामचा निसर्ग अतिशय सुंदर आहे. उन्हाळ्यात थंड आणि हिवाळ्यात सुसह्य थंडी. हिवाळ्यात सर्वसाधारण तापमान ११ – १२ आणि उन्हाळ्यात २०–२९ या फरकात असते. संपूर्ण प्रदेश मान्सूनच्या अधिपत्याखाली आहे. मे पासून सप्टेंबर पर्यंत जोरदार पाऊस पडतो व त्याचे सरासरी प्रमाण प्रतिवर्षी २४५ सें. मी. पर्यंत असते.

'ऐझॉल' येथील पावसाचे सरासरी प्रमाण २०८ सें. मी. तर तंगलेई येथे ३५० सें. मी. इतके आहे. हिवाळ्यामध्ये स्वच्छ निळे आकाश आणि सर्व पर्वतरांगा आल्हाददायक धुक्याने आच्छादलेल्या असतात. प्रत्येक घळीमधील ढगांनी भरलेली तळी आकर्षक सौंदर्यात भर घालतात.

अतिशय सुंदर निसर्गाचे देणे लाभलेल्या मिझोराममध्ये प्राणी व वनस्पतींची प्रचंड विविधता आहे. त्याचसोबत अतिशय उत्कृष्ट व नयनमनोहर दृश्य सुद्धा पाहण्यास मिळतात. ऐझॉल, चंफाई, उर्टलांग, साईरंग, मामीत, कोलासीब यांसारखे इतर बरेच प्रदेश वाखाणण्याजोगे आणि सुंदर आहेत. पर्यटनासोबत इतर जीवनावश्यक गोष्टींचे याठिकाणी वितरण व उत्पादन होते. मिझोराम विषुववृत्ताच्या उत्तरेकडे २१° ५८' आणि २४° ३५' अक्षांश तर ९२° १५' आणि ९२° २९' रेखांश पूर्वेकडे आहे. संपूर्ण मिझोरामचे क्षेत्रफळ २१,०८७ चौ. कि. मी. आहे.

२००१ च्या जनगणनेनुसार मिझोरामची एकूण लोकसंख्या ८,९१,०५८ आहे, त्यापैकी ४,३१,२७५ स्त्रिया तर ४,५९,७८३ पुरुष आहेत दर १००० पुरुषांमागे ९३८ स्त्रिया असे गुणोत्तर आहे. पूर्वीची स्थिती आता पूर्ण बदलली असून वाढत्या जागतिकीकरणाचा आणि इतर बदलांचा परिणाम मिझोरामवरही मोठ्या प्रमाणावर झाला आहे.

## ‘मिझो’ लोक

‘मिझो’ लोक हे मंगोल वंशाचे असून अनेक शतकांपूर्वी भारतात स्थलांतरित झालेल्या मंगोल लोकांचे ते वंशज असावेत. त्यांचा तात्पुरता मुक्काम हा पश्चिम म्यानमारमध्ये होता व सातव्या शतकाच्या सुमारास प्रवाहाप्रमाणे मिझोरामकडे त्यांचे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झाले. दहाव्या शतकापर्यंतच्या त्यांच्या स्थलांतराच्या खुणा सापडतात.

गेल्या काही दशकात मिझोरामच्या लोकसंख्येत हळुवार होणारी वाढ ही बऱ्याच कारणांचा परिपाक आहे. जसे भौगोलिकता, अनारोग्य. मिझोराममध्ये १९१८-१९२० साली आलेली सार्वजनिक साथ, त्याचबरोबर १९११-१२ चा दुष्काळ यामुळे त्याकाळी बरेच लोक मृत्यूमुखी पडले आणि बऱ्याच कुटुंबांनी त्यावेळी मुख्य प्रदेश सोडून त्रिपुरा आणि चितगांवच्या डोंगराळ भागात आश्रय घेतला होता. १९३१ च्या जनगणनेनुसार आसामच्या डोंगराळ भागातील लोकसंख्या त्यावेळी लक्षणीयरित्या वाढली होती. जगात ‘मिझो’ लोक हे त्यांच्या अतिथ्यशीलतेमुळे प्रसिद्ध आहेत. ‘मिझो’ लोकांमध्ये जातीभेद आणि कुठल्याही प्रकारे लिंगभेद अस्तित्वात नाहीत.

हा समाज एकमेकांशी ‘Tlawmngaihna’ या शब्दाने घट्टपणे जोडला गेला आहे. या शब्दाचा अर्थ म्हणजे आदरातिथ्य, दया, निस्वार्थीपणा आणि दुसऱ्यांच्या मदतीला नेहमीच तत्पर असणे असा आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या आसपास ‘मिझो’ लोक ब्रिटिश मिशनऱ्यांच्या प्रभावाखाली आले आणि आज बहुतेक सारे ‘मिझो’ ख्रिश्चन आहेत. याचा परिणाम म्हणजे ‘मिझो’ लोकांमध्ये झालेला शिक्षणाचा प्रसार. मिशनऱ्यांनी ‘मिझो’ भाषेपेक्षा रोमन लिपीतून शिक्षणाला प्राधान्य दिले. याचा परिणाम म्हणून १९९८ साली ९५% जनता साक्षर होती. मिझोंचे सामाजिक केंद्र म्हणजे ‘खेडे’ आहे. लोकांचे आयुष्य या ना त्या कारणाने खेड्याशी जोडले गेले आहे. गावे ही साधारणतः डोंगरमाथ्यावरच असतात. प्रत्येक गावाच्या केंद्रस्थानी गावच्या प्रमुखाचे घर असते. तरुणवर्गाच्या स्थानाला झॉलबक असे म्हणतात. हे अगदी ठळक आणि महत्त्वाचे ठिकाण असते. पूर्वीच्या काळी गावातले सारे तरुण याच ठिकाणी राहात असत.

‘झॉलबक’ हे एक प्रशिक्षण केंद्रच असे की जेथे सर्व तरुण भविष्यातील सुशिक्षित आणि जबाबदार घटक म्हणून तावूनसुलाखून निघत. ‘मिझो’ लोकांचा सामाजिक जीवनाचा धागा अनेक अवघड आणि खूप साऱ्या स्थित्यंतरामधून गेला आहे. मिशनऱ्यांच्या आगमनापूर्वी प्रत्येक घराण्याने अथवा काही कुळे मिळून एक अशाप्रकारे गावे वसविली. मिशनऱ्यांच्या सहभागानंतर सुद्धा लोकांनी आपली काही तत्त्वे आजही तशीच बाळगली आहेत. आणि त्यांना वेगळीच खोली प्राप्त झाली आहे. मिझोराममध्ये ९०% लोक शेतकरी आहेत. सगळे गाव हे एका कुटुंबाप्रमाणे राहते. बाळाचा जन्म, लग्न आणि मृत्यू सगळा गाव एकत्र साजरा करतो. गावात सहभोजनाला एक वेगळेच महत्त्व असते आणि त्याला सगळे गाव हजर असते.

१९६६ साली झालेल्या वांशिक लढाईमुळे ‘मिझो’ लोक अतिशय एकटे पडले होते. अराजक स्थितीत अडकलेले आणि कोणत्याही प्रकारची मदत न मिळाल्यामुळे ते पूर्णपणे हतबल झाले होते. अशावेळी त्यांना संरक्षण आणि आत्मविश्वास मिळणे जरुरीचे होते. त्यावेळचे प्लानिंग कमिटीचे मेंबर त्रैलोक सिंग यांनी गावांचे विभाजन आणि एकत्रिकरण सुचविले. परंतु मिझोरामच्या डोंगराळ प्रदेशात लोकांना मुख्य

स्थानापासून हलवून पुन्हा अतिशय अवघड भागात पुनर्वसन करणे जोखमीचे होते; परंतु शेतजमिनीचा अभाव, भौतिक सुविधांचा अभाव अशाप्रकारच्या अनेक अडचणींवर मात करुन तसेच वेगवेगळे प्रकल्प राबवून नवीन गावांचे आराखडे तयार करुन, गावकऱ्यांना हलवले गेले. नवीन गावांमध्ये त्यांना विविध प्रकारच्या सुविधा पुरवल्या गेल्या. या एकत्रिकरणाला तब्बल तीन वर्षांचा कालावधी लागला. हे सर्व काम लष्कराच्या देखरेखीखाली पूर्ण करण्यात आले आणि लोकांना यशस्वीरित्या संरक्षण मिळाले. गावाचे एकूण चार प्रकार पाडले गेले आणि सर्व जनता त्यात विभागली गेली.

## मिझोरामच्या बोलीभाषा

मिझोराममध्ये एकूण १४ प्रकारच्या बोलीभाषा आणि त्यांचे प्रकार आढळतात. बरेचदा मातृभाषेनुसार समूहगट आणि त्यांचे प्रदेशही आढळतात. बहुतेक आदिवासींची स्वत:ची अशी एक बोली भाषा असते. लुसै, चमका, रैआंग, वावी, लाखेर इ. काही बोलीभाषा अथवा पोटभाषा आदिवासींमध्ये वापरल्या जातात. तरीही लुसै हीच मिझोरामची प्रमुख भाषा आहे. मिझो म्हणजे फक्त एक समूह नसून लुसै, राल्ते, मार, पावी यांसारख्या समुहांना एकत्रितपणे वापरलेली व्याख्या आहे. 'लुसै' ही राजभाषा आहे. मिझो भाषा आता माध्यमिक शिक्षणाचे माध्यम म्हणून वापरली जाते. गुवाहाटी आणि नॉर्थ-इस्टर्न हिल या विद्यापीठांमध्ये मिझो ही भाषा शिकविली जाते.

मिझो भाषेबरोबरच इतरही काही भाषा मिझोराममध्ये उदा. हिंदी, नेपाळी, गोरखाली, बंगाली, मल्याळी, तमिळी, आसामी, खासी, तेलगू त्याचप्रमाणे इतर ज्या ज्या राज्यांशी भौगोलिक जवळीक आहे, त्या भाषेचा प्रभाव सुद्धा आढळतो आणि त्यामुळे अनेक पोटभाषाही आढळतात. पण शुद्धता, उच्चार आणि व्याकरणाने पूर्ण अशी भाषा म्हणजे 'लुसै'. इतर भाषा तुलनेने कमी प्रचलित आहेत.

## धर्म व जाती

भारतातील इतर राज्यांप्रमाणेच मिझोराममध्येही विविध जाती धर्माच्या नागरिकांचा अधिवास आहे. यामध्येही ख्रिश्चन, बुद्ध, हिंदू आणि मुस्लिम धर्माचे लोक प्रामुख्याने आढळतात. त्याचबरोबर जैन, शिब लोकही आहेत. धर्माने ख्रिश्चन नागरिक सर्वाधिक आहेत.

ख्रिश्चन असूनही आदिवासी लोक मात्र अजूनही त्यांच्या स्वत:च्या धार्मिक, अध्यात्मिक चालीरीती, परंपरा, रुढी, समज पाळतात आणि मानतात असेच दिसते.

ख्रिश्चन धर्माच्या खालोखाल बुद्ध धर्मीय लोकांचे प्रमाण येथे जास्त आहे. साधारणत: चकमा लोक बुद्ध धर्मीय आहेत. हिंदू धर्मीय हे प्रामुख्याने व्यापारी तसेच सरकारी कर्मचारी आहेत. ते साधारणत: तात्पुरत्या वास्तव्यासाठी असतात. त्याचप्रमाणे नेपाळी लोकही चराऊ कुरण अथवा पशुधनाच्या निमित्ताने येथे येतात.

पूर्वी मिझो लोकांच्या धार्मिक कल्पना वेगळ्या होत्या. आता जर आपण पाहिले तर मिझोंच्या राहणीमानावरुन वाटेल की त्यांचे मूळ हे समान आहे. अत्यंत आधुनिक आणि समान असे मिझोंचे राहणीमान आहे. पूर्वी प्रत्येक आदिवासी जमातीची अथवा समाजाची स्वत:ची अशी एक खासीयत असे. प्रत्येकजण त्याच्या केशरचनेवरुनही तो कोणत्या समाजाचा आहे, हे ओळखता येत असे. लाखेर, पावी यांसारख्या प्रत्येक जमातीचे राहणीमान व केशरचना प्रामुख्याने वेगळी

असे. मिझोराममध्ये आदिवासी, ग्रामीण किंवा शहरी असा भेद कधीही झाला नाही. कोणत्याही आदिवासी समाजाने दुसऱ्या आदिवासी समाजात मिसळणे अथवा लग्न करणे मान्य आहे. मिझो लोक सूर्य, चंद्र यांसारख्या कोणत्याच कल्पना मानत नाहीत. त्यांच्या देवाबद्दलच्या संकल्पना या फार वेगळ्या आहेत.

महत्त्वाच्या आदिवासी समाजांमध्ये लुसै (Lusei), राल्ते (Ralte), Paite, Ngente, Khawlhzing, Khiangte, Rauite, Renthlei, Chawngthu, Thando, Lakher / Mara, Pavi, Hmar, Chauhte, Tlaw, Zawngfe, Vamgchhia & Hualnoo आहेत. यातील Pavi व Hmar सोडून सारी कुळांची नावे आहेत. प्रत्येक जमातीला स्वत:चा असा इतिहास आहे. स्वतंत्र संस्कृती, चालीरीती आणि भौगोलिक वैशिष्ठ्ये आहेत. इतर बहुतांश राज्यांप्रमाणेच मिझोराममधील समाज पितृसत्ताक आहे. जरी आई वेगळ्या कुळातील किंवा जमातीतील असली तरी नाव अथवा वंश वडिलांचाच लावला जातो. संपत्ती हक्क घरातील प्रमुख व्यक्तीकडेच असतात. एकत्र कुटुंबपद्धती अगदीच नाही, असे नाही; पण नवपरिणीत जोडपे वेगळे राहणे पसंत करते. संपत्तीची वाटणी फक्त वारसांमध्ये होते.

महिला प्रत्यक्षरित्या संपत्तीत वाटेकरी नसतात. स्त्रियांच्या नावाने हुंडा ठेवला जातो, ज्याला 'युआम' असे म्हणतात. यामध्ये बास्केट, कपडे, हातमाग आणि एक जवाहिरांचा अलंकार यांचा समावेश असतो. वस्तू संस्कृती तसेच उपयुक्त दागिन्यांचे स्त्रियांच्या जीवनातील महत्त्वच त्यातून दिसते. सांपत्तिक व्यवहारासाठी अनेक कायदे आणि पद्धती सामाजिक पातळीवर कार्यरत आहेत.

## विवाहपद्धती

'लग्न' या विषयात मिझो लोक बरेच मोकळे आहेत. कोणत्याही मुलाने त्याच्या पसंतीने लग्न केल्यास कोणत्याही कारणास्तव त्याला त्रास दिला जात नाही. मुलगा त्याची आई, बहीण आणि मुलगी सोडून अगदी कोणत्याही स्त्रीशी लग्न करु शकतो. प्रत्येक जमातीमध्ये ही बाब सारखी असली तरी त्यामागची कारणे आणि दृष्टीकोन वेगळे आहेत.

मुलामुलींना जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य जरी असले तरी लग्न व इतर गोष्टी ठरवण्याचा अधिकार आईवडिलांनाच असतो. मुलीला जर मुलाचा प्रस्ताव मान्य नसेल आणि तिचे आईवडील जरी तयार असतील तरी नाही म्हणण्याचा तिला पूर्ण अधिकार असतो.

मुलाची पसंती नक्की झाल्यावर पुढाकार घेण्याचे काम आईवडीलच करतात. प्रथम मुलाचे आईवडील मुलीच्या घरी जाऊन बोलणी करतात व परततात. मुलीला मान्य असेल तर दुसऱ्या दिवशी मुलीकडील मंडळी त्यांच्या मित्रपरिवारासोबत मुलाच्या घरी जातात व काही लग्नसंबंधी कार्ये पूर्ण करतात. अगदी ख्रिस्ती धर्म स्वीकारलेले कुटुंबही आपली ही पारंपरिक पद्धत अगदी तंतोतंत पाळते. लग्नानंतर मुलगी सासरीच राहते. विधवाविवाहासही पूर्णपणे मान्यता आहे. त्या स्त्रीला मूल असेल तर त्या मुलाची संपूर्ण जबाबदारी तिच्या कालवश झालेल्या पतीच्या नातेवाईकांची असते. त्याबरोबर संपत्तीचा हक्कही त्यांच्याकडेच राहतो. बरेचदा तिचा हुंडाही तिला परत मिळतो. घटस्फोटाचे प्रमाण अगदी नगण्य आढळते. १-२ % या प्रमाणात घटस्फोट होतात. यावेळी स्त्रीला तिचा हुंडा परत मिळतो आणि जर ती वयस्कर असेल तर काही रक्कम तिला महिन्याचा खर्च म्हणून सुद्धा मिळतो.

मिझो लोकांमध्ये विवाहपूर्व संबंधांवर काही बंधने अथवा छुपेपणा नाही. तरुण मुली-मुले एकमेकांत सहज मिसळतात. शिवाय यात कोणी कोणत्याही प्रकारची दूषणे त्यांना देत नाही. त्यांना भावी जोडीदार म्हणून समजून घेण्यास पूर्णवेळ दिला जातो. पूर्वी बालविवाह होत असत; परंतु आता पूर्णपणे बंद झालेला आहे. लग्नानंतर शक्यतो नवीन घर बांधण्याकडे आणि स्वतंत्र राहण्याकडे कल असतो.

साधारणत: घर हे १५ फूट आडवे आणि ३० फूट लांब असते. लाकडी फळ्या तसेच बांबूच्या भिंती व नारळाच्या झावळ्यांपासून केलेल्या घराला बांबूचेच छत असते. ५-८ फूट उभ्या लाकडावर छत असते, तसेच जमीन बांबूच्या चटयांपासून सुशोभित केलेली असते. लाकडाच्या वापरामुळे घरे उबदार असतात.

## आहार

मिझो लोकांचा आहार अतिशय साधा असतो. भात हे त्यांचे प्रमुख अन्न आहे. भोपळा, कोबी, कांदा, वांगे, याम, कोथिंबीर, आले, बटाटे इ. भाज्या उपलब्धतमुळे नेहमी खाल्ल्या जातात. मांसाहार मिझोच्या अन्नाचा प्रमुख भाग नव्हता; पण आता मात्र त्याचे प्रमाण वाढत चालले आहे.

रोज तीन वेळा आहार घेतला जातो. मिझोंची नवी पिढी आहारात वेगाने बदल करीत आहे. तेल, मसाले आणि मांसाहार यांचे प्रमाण वाढू लागले आहे आणि त्याचा परिणाम त्यांच्या शारीरिक जडणघडणींवर झालेला आहे. मांसाहारात डुक्कर, बैल, म्हैस, कुत्रे, हरीण यासोबत बऱ्याच पक्ष्यांचा समावेश असतो. पाश्‍चिमात्य आहार पद्धतीने त्यांच्या जीवनात केव्हाच प्रवेश केला आहे.

• • •

(पृष्ठ क्र. ४८ वरुन)

बांबू विकास समन्वय समितीकडे अहवाल सादर करावा.

**३) बांबू आधारित उद्योगांना देयनिधी संदर्भात परीक्षण समिती**

एक कार्यकारी समिती ज्यामध्ये विभागीय प्रतिनिधी पर्यावरण व वन, उद्योग, विल, व्यापार, ग्राम- विकास विभागाचे तज्ञ या समितीत असतील. ही समिती उद्योजकांकडून येणाऱ्या प्रस्तावांचे परीक्षण करेल, त्याच बरोबर उपलब्ध कच्चा माल, आर्थिक स्थिती, गुंतवणूकीचे स्त्रोत आणि उद्योजकाची क्षमता पाहून उद्योगाला प्रमाणित करतील.

**बांबू संसाधन विकास विभाग**

कायम स्वरुपी बांबू विकास विभागाची स्थापना पर्यावरण व वन विभागात करावी. ह्याचे प्राथमिक काम संसाधन विकास आणि तांत्रिक तज्ञ मार्गदर्शन पुरविणे. बांबू लागवडीचे व्यवस्थापन. ह्याचे प्रमुख वनअधिकारी असतील.

बांबू विकास व कटाई करता एक जलदगती कृति दल स्थापन करणे.

वन अधिकाऱ्याच्या अध्यक्षेखाली एक जलद कृति दल बांबू संसाधन विकास विभागा अंतर्गत स्थापन करण्यात येईल. ह्या कृतिदलाचे काम केवळ बांबू विषयक कृति, विपणन आणि निर्यात करणे हे असेल.

*(मराठी अनुवाद : डॉ. शैलेश दळवी)*

• • •

# मिझोरामची नृत्यकला

**कु. चारुलता दत्तात्रय नांद्रे**
पुणे विद्यापीठ

मिझोरामच्या अनेक वैशिष्ट्यांप्रमाणे 'मिझो' संस्कृतीतील नृत्येही वैशिष्ट्यपूर्ण आहेत. 'मिझो' नृत्याचे अनेक प्रकार आढळतात. जसे खुआलम, चेरॉ, सरलामकाई, सोलकाई, चैलम, चॉग्लाईझाम, चैहलाम, त्लांगलाम, झंगतालम.

नृत्य हे बरेचदा करमणुकीचे अथवा कलाविष्काराचे साधन राहिले आहे. पण 'मिझो' नृत्यामागे अर्थ आहे, कारण आहे. 'मिझो' लोक नृत्य फक्त आनंदाच्या प्रसंगीच नाही, तर दुःखद प्रसंगीही सादर करतात. तसेच काही प्राप्त करण्याकरीताही नृत्याचा वापर केला जातो. या नृत्यांना काही मोजक्या वाद्यांनी साज चढविलेला असतो. जसे गाँग आणि ड्रम. प्रत्येक नृत्यांत वाद्यांचा जाणीवपूर्वक वापर केला जातो.

**खुआलाम :** खुआलाम म्हणजे पाहुण्यांसाठीचे नृत्य हा नृत्यप्रकार साधारणपणे खुआंगचावी या सणाला सादर केला जातो. समाजामध्ये एक वेगळी जागा मिळवण्यासाठी तसेच स्वर्गामध्ये जागा मिळवण्यासाठी इच्छुकाला 'थांगचुआह' हा मान मिळविणे आवश्यक असते व मान मिळविण्याचे दोन मार्ग असतात.

पहिला मार्ग म्हणजे व्यक्तीने काही प्राण्यांची शिकार करुन आपले कौशल्य सिद्ध करावयाचे असते. या प्राण्यासाठी काही ठराविक प्राण्यांचीच शिकार झाली पाहिजे असा दंडक असतो.

दुसरा मार्ग म्हणजे वेगवेगळे पराक्रम व नृत्य प्रकार सादर करणे. त्यामुळे 'थांगचुआह' या प्रकारात फक्त शूर आणि श्रीमंत व्यक्तीच भाग घेतात. 'थांगचुआह' साठी केल्या जाणाऱ्या सोहळ्याला 'खुआंगचावी' म्हटले जाते, तर या सोहळ्यात सादर केल्या जाणाऱ्या नृत्यालाच 'खुआलाम' असे संबोधले जाते.

या समारंभाला दुसऱ्या गावातून पाहुण्यांना आमंत्रण देऊन बोलावले जाते. नृत्य करणाऱ्या व्यक्ती 'पुआंडम' म्हणजे हाताने विणलेले मिझोंचे पारंपरिक वस्त्र परिधान करतात. हे वस्त्र काळ्या, लाल, पिवळ्या व हिरव्या रंगाच्या धाग्यांनी बनलेले असते. इतर मिझो नृत्यांप्रमाणेच या नृत्याला गाँग म्हणजेच 'दारबू'च्या वाद्यांचा वापर करतात, पण गाणे गायिले जात नाही. या नृत्यांत लोक मोठ्या संख्येने भाग घेतात.

**चेरॉ :** 'चेरॉ' हा येथील अतिशय पुरातन आणि पारंपरिक नृत्य प्रकार आहे. असे मानले जाते की हा नृत्यप्रकार पहिल्या शतकापासून अस्तित्वात आहे. या नृत्यप्रकारात पुरुष एकमेकांसमोर पण लांब बसतात. समोरासमोरील दोघे दोन हातात बांबू पकडतात. या बांबूच्या तालावर तरुण मुली नृत्य सादर करतात. हा नृत्यप्रकार सध्या सर्वच सणांना सादर केला जातो. गाँग आणि ड्रमचा वापर केला जातो. आजच्या काळात आधुनिक संगीताचाही वापर केला जातो.

**सरलामकाई :** दक्षिण मिझोराममधील पावी आणि मारा या दोन समाजांकडून हा अत्यंत कलात्मक नृत्यप्रकार सादर केला जातो. बऱ्याच वर्षांपूर्वी जेव्हा आदिवासी जमाती एकमेकांशी सतत युद्धात गुंतलेल्या असत. तेव्हा विजेता योद्धा युद्धात हरविलेल्या व्यक्तीचे कलम केलेले मस्तक आणून हा सोहळा साजरा करित असे. पराभूत व्यक्तीचा आत्माही आपला गुलाम राहावा यासाठी हा सोहळा साजरा केला जात असे. हा सोहळा संपूर्ण पाच दिवस चालतो. पहिल्या दोन दिवसात गाणी गाणे, मद्यपान व मांसाहार या गोष्टींची मेजवाणी असते. तिसऱ्या दिवशी एक मोठे डुक्कर मारले जाते. या डुकराच्या रक्ताने विजेता स्वत:चे शरीर रंगवतो व चौथ्या दिवशी हे रक्त धुतले जाते. या प्रकारात पाच दिवसाचा सोहळा साजरा केला जातो. या सोहळ्याशी निगडीत अनेक समज गैरसमज अस्तित्वात आहेत. 'सरलामकाई' नृत्य याच सोहळ्यात सादर केले जाते. पूर्वी या नृत्यात विजेता सुद्धा सहभागी होत असे. आता मात्र बऱ्याच गोष्टी बदलल्या आहेत. या नृत्यात मुले-मुली रिंगण करतात व प्रमुख व्यक्तीने योध्द्याचा वेश परिधान केलेला असतो.

**चैलाम :** मिझोंच्या जीवनास अतिशय महत्वाचे स्थान असलेल्या 'चपचर कुट' या सणामध्ये 'चैलाम' नृत्य सादर केले जाते. या नृत्यात मिझो पुरुष आणि स्त्री एकाआड एक असे गोल करुन उभे राहतात. गोलामध्ये एक ढोलवादक व शिंग वाजवणारा वादक असे दोन जण उभे राहतात. या नृत्यात गाणे गायिले जाते. ढोलाच्या तालावर सर्वजण फेर धरुन नृत्य करतात. चैलाम नृत्याचे एकूण चार प्रकार पडतात. या नृत्यामागच्या प्रेरणेची एक कथा प्रसिद्ध आहे.

एकदा राजा आणि त्याचे सैन्य शिकारीसाठी बाहेर पडले असताना, शिकार न मिळाल्याने ते



रिकाम्या हाताने परततात. सैन्याची निराशा राजाच्या लक्षात आल्यावर राजाने शिकारीवर आलेल्या सगळ्या लोकांना महाल्यावर तांदूळाची दारु पिण्याचे आमंत्रण दिले. या मेजवानीचा शेवट नृत्य आणि गायनाने झाला, ज्यामुळे सर्व सैन्य आनंदीत झाले व तणावमुक्त झाले. त्यावेळेपासून आजपर्यंत दरवर्षी हा सण वरील प्रसंगाची आठवण म्हणून साजरा करुन 'चैलाम' नृत्य सादर केले जाते. या नृत्यात ढोल शिंगाचा वापर केला जातो व नृत्यात तांदूळाची दारु प्यायली जाते.

**चाँग्लायजौन :** हा नृत्य प्रकार 'पावी' या जमातीमध्ये आढळून येतो. दोन वेगवेगळ्या प्रसंगी हे नृत्य सादर केले जाते.

१) पत्नीच्या मृत्यूनंतर पती शोक व्यक्त करण्याकरिता हे नृत्य करतो. दम लागेपर्यंत त्याला हे नृत्य करावे लागते. पती दमल्यावर मित्र आणि नातेवाईक त्याच्यातर्फे नृत्य करीत राहतात.

२) याचप्रकारे एखाद्या शिकाऱ्याने बक्षिस मिळविल्यास त्या आनंदाप्रित्यर्थ हे नृत्य सादर केले जाते. मोठ्या संख्येने लोक या नृत्यात सहभागी होतात. मुले-मुली रांगेत उभे राहून ढोलाच्या तालावर ताल धरतात, तसेच हे नृत्य करताना अंगावर शाल घेणे आवश्यक असते.

**चेहलाम :** या नृत्यप्रकाराचा जन्म १९०० सालानंतर 'त्लांगलाम' या नृत्याच्या आणि 'पुमा झाई' या गाण्याच्या धर्तीवर झाला. या नृत्यात कोणीही भाग घेऊ शकते. जसा नृत्याला वेग येऊ लागतो व जोर वाढू लागतो, तसे हळूहळू प्रत्येक जण आपापले स्थान सोडून या नृत्याचा आनंद लुटतो. पाहुण्यांनाही नृत्यासाठी आमंत्रित केले जाते.

**त्लांगलाम :** हा नृत्यप्रकार संपूर्ण मिझोराममध्ये सादर केला जातो. 'पुमा झाई' या गाण्याच्या सोबतीने या नृत्याचे अनेकविध प्रकार आढळतात. या नृत्याची लोकप्रियता सतत वाढत असून यात मुले मुली दोघेही भाग घेऊ शकतात.

**झांगतालाम :** झांगतालाम हे एक प्रसिद्ध 'पैहते' नृत्य असून स्त्रिया व पुरुष दोघे मिळून ते सादर करतात. नृत्य करताना, नृत्य करणारा संलग्न गाणे गातो. ढोल वादक नृत्याचा दिग्दर्शक व प्रमुख असतो. या नृत्याचा कालावधी वादळावर अवलंबून असतो.

अशा या विविध 'मिझो' नृत्यांवर कोणी भुलला नाही तो विरळाच.

• • •

# मिझोराममधील लोकांची भौतिक संस्कृती

– जुई धालेवाडीकर

मिझो समाजात शेती हा फक्त पारंपरिक व्यवसाय नाही, तर शेती ही एक संस्कृती आहे. शेती हा व्यवसाय प्राचीन काळापासून हे लोक करीत आहेत. राज्य सरकारने जरी जुन्या पारंपरिक पध्दतींवर बंदी आणली असली तरी हे लोक नवीन पर्यायांच्या अभावाने भटकी शेती करीत आहेत.

या शेतीपध्दतीमध्ये लोक प्रथम जंगल तोडतात, त्यानंतर जाळतात आणि मगच त्या राखेमध्ये बियांची पेरणी केली जाते. त्यामुळे या शेतीसाठी अत्याधुनिक अवजारे नियमित वापरण्याची गरज भासत नाही.

- CHEM – हे अवजार मुख्यत: खुरपणीसाठी वापरले जाते. हे हत्यार त्रिकोणी सुरीसारखे असून त्याची एक बाजू फारच धारदार असते. खुरपणी वेगात करण्यासाठी हे हत्यार फार उपयोगी आहे.
- TUTHLAWH : हे हत्यार सुध्दा खुरपणीसाठीच वापरलं जाते; पण त्याचबरोबर हे छिद्र पाडण्यासाठीसुध्दा वापरले जाते. हे हत्यार CHEM च्या तुलनेने वजनाने हलके आहे.
- HERI : हे हत्यार कुदळीसारखे असते. हे मुख्यत्त्वे झाडाच्या फांद्या तोडण्यासाठी वापरतात. प्राचीन काळात दगडी हत्यारेही वापरात होती. अनेक ठिकाणांच्या उत्खननातून ही हत्यारे मिळालेली आहेत.
- FAWYAH : ह्या हत्यारांचा उपयोग पीक तोडणीसाठी करतात. शेतीसाठी फक्त लोखंडी अवजारेच आहेत, असे नाही तर इतरही साधने महत्त्वाची असतात.
- IPTE : मिझो लोक जंगलात गेल्यावर जेव्हा शेतात जाळलेली राख गोळा करण्यासाठी आणि अजून काही शेतीची हत्यारे सोबत नेण्यासाठी एक कापडी पिशवी वापरतात, त्याला इप्ते (IPTE) असे म्हणतात.
- EM : सगळ्या मोठ्या टोपल्यांसाठी EM एकच नाव आहे. यामध्ये सर्व मोठ्या टोपल्यांचा (उदा. डावरान, एम्पाई, एम्पिंग, पैकबांग, सियाकटुम, टलाएम, तुईचावीक्रांग, पैपर कलांग) समावेश होतो. या सगळ्या टोपल्यांचा उपयोग मुख्यत: पीक तोडणीच्यावेळी होतो.

**झूम शेती**

झूम शेतीच्या जागेची निवड गावातील मुख्य लोक करतात. एकदा एखाद्या क्षेत्राची निवड झाली की ते क्षेत्र गावकऱ्यांना दिले जाते. त्या जागेचे क्षेत्रफळ हे कुटुंबातील सक्षम सदस्यांवर अवलंबून असते. ही झूम शेतीची जागा सतत बदलत असल्याने ती कायमसाठी कोणाच्याही मालकीची होत नाही.

झूम शेतीला सुरुवात करताना आधी त्या क्षेत्रफळाच्या सीमा ठरवून घेतल्या जातात. त्यानंतर सगळ्या झाडांची कापणी करुन जंगल साफ करुन जमीन शेतीसाठी योग्य केली जाते. त्यानंतर सर्व कापलेली झाडे, बांबू ज्यांना CHAP म्हटलं जाते, ते उन्हात वाळवण्यासाठी ठेवले जाते. याच काळात बुद्ध लोक

CHAPCHAR KUT नावाचा सण साजरा करतात. हा सण साधारणपणे मार्चच्या शेवटच्या आठवड्यात किंवा एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात साजरा करतात. यानंतरच जमीन पेरणीसाठी योग्य होते. म्हणजेच पाऊस सुरु होण्यापूर्वीच हा सण साजरा होतो.

तांदूळ हे प्रमुख पीक असून ज्वारी, कापूस, शेंगदाणा, भोपळा,काकडी, मिरची, भेंडी आणि अजून काही भाज्या घेतात. हे लोक मुख्यत: डोंगराळ भागात शेती करतात आणि नांगरणीसाठीसुध्दा गुरांचा फारसा वापर करीत नाहीत. तसे पाहता झूम शेती व या लोकांची वस्ती यामध्ये बरेच अंतर असते. परंतु दळणवळणाच्या कमतरतेमुळे शेतीची उत्पादने डोक्यावर उचलूनच आणली जातात.

प्रत्येकासाठी शेतात एक घर असतं त्या घराला THALM असे म्हटले जाते. या घराला फक्त छप्पर नसतं; पण जे असतं ते अतिशय व्यवस्थित व आटोपशीर असतं. पेरणी व कापणीच्या वेळेस लोक याच घरात येऊन राहतात.

या लोकांसाठी शेती करताना सगळ्यात अवघड गोष्ट म्हणजे हे लोक डोंगरावर शेती करीत असल्याने त्यांना प्रचंड पावसाचा आणि प्रखर उन्हाचा सामना करावा लागतो. यांपासून बचावाकरिता 'खुंबेयु' म्हणजे एक प्रकारची टोपी पुरुष वापरतात.

**मत्स्यव्यवसायातील साधने**

मिझो लोकांसाठी मासेमारी हा मोठा व्यवसाय आहे. पूरक अन्न म्हणून मासे आणि गोड्या पाण्यातील प्राण्यांकडे हे लोक पाहतात. पूर्वी जेव्हा शेतीची कामे फार नसत, अशाच महिन्यात हे लोक मासेमारी करण्यास जात; पण आता मात्र काही लोकांनी मासेमारी हाच आपला मुख्य व्यवसाय म्हणून निवडला आहे. यामुळे घरगुती गरजा भागवून उत्पन्नही मिळते.

खरंतर लहानपणापासूनच मिझो लोकांना मासेमारीची आवड असते. यासाठी ते वेगवेगळ्या पध्दती तसेच साधनेही वापरतात. उन्हाळ्याच्या दिवसात ते कुठलेही साधन न वापरता ज्या भागात माशांचे वास्तव्य जास्त दिसते, अशा भागात पाण्यात हात घालून मासे पकडतात. याशिवाय एक पद्धत म्हणजे अशा भागातील पाणी अतिशय जोरात हाताने हलवून बाहेर आलेले मासे पटकन पकडले जातात. मिझो लोकांना लहानपणापासूनच मासेमारीचे आकर्षण असते.

फार पूर्वीपासून आणि सवयीने अगदी अलिकडच्या काळापर्यंत मासेमारीसाठी संघ व्हूक म्हणजे खरोखरी माशांना मारणे अशी पारंपरिक पध्दत वापरली जायची. यामध्ये वेगवेगळया प्रकारची रासायनिक द्रव्ये पाण्यात टाकून मासे मारायचे आणि त्यानंतर त्यांना बाहेर काढले जायचे. पण या रासायनिक द्रव्यांचा विपरीत परिणाम फक्त माशांवरच नाही तर पाण्यातील इतर जीवांवरही होत असे. अलिकडे रासायनिक विषारी पदार्थाचाही वापर सुरु झाल्यावर त्याचा विपरीत परिणाम होतोय हे लक्षात आल्यावर सरकारने या पध्दतींवर बंदी आणली. याशिवाय येथे जाळे वापरुनही मासेमारी केली जाते. या जाळ्याला लेंडन असे म्हणतात. ही पद्धत जुनीच आहे. त्यामध्ये २ प्रकारची जाळी वापरतात.

'लेनपुई' हे जाळं फार मोठं असून वजनाला जास्त असतं आणि याचा उपयोग मोठे मासे पकडण्यासाठी केला जातो. दुसऱ्या प्रकारचं जाळं अतिशय छोटं असतं आणि ते छोट्या सरोवरासारख्या ठिकाणी छोटे मासे पकडण्याकरिता वापरलं जातं. खरंतर गावात फक्त एक-दोघंच ही जाळी विणण्यात निपुण असतात. पण प्रत्येक घरात जाळी मात्र अगदी नक्कीच असतात. हे जाळं बनविण्यासाठी कापसाचे चार लांब धागे एकत्र विणून त्याचा एक धागा बनवितात आणि

मग असे दोन धागे पुन्हा एकदा विणून जाळं बनवलं जातं. हे जाळं बनविण्यासाठी विणकर जमिनीवर बसतो. धाग्याचा एक भाग विणकराच्या डाव्या हातात असतो आणि हा धागा आठ वेळा 'टोए' वर गुंडाळला जातो. टोए म्हणजे अशी वस्तू की जी विणकर उजव्या हातात धरुन त्यावर धागा गुंडाळतो; यामुळे तो धागा अधिक जाड आणि मजबूत होऊ शकतो.

जाळ्याचा हवा तो आकार तयार होईपर्यंत जाळे विणण्याची ही पध्दत सुरुच असते. आजकाल या जाळ्यांना शिसाचा वापर करुन वजन दिलं जातं; परंतु जेव्हा शिसे नव्हती तेव्हा भाजलेल्या मातीचा वापर केला जात असे. पूर्ण जाळ्याचे वजन साधारणत: ३ किलो असते. याशिवाय अन्य ४ प्रकारची जाळी येथील लोक मच्छीमारीसाठी वापरतात.

१) लेनपुई : नावाचे जाळे जे आपण मागे पाहिले आहे. मोठ्या आकाराचे मासे पकडण्यासाठी हे जाळे वापरतात.

२) Lenfang : हे जाळे आकाराने लहान असून फक्त लहान मासे पकडण्याकरिता अलिकडेच हे जाळे वापरले जाते.

३) Lensuah : हे एक गोल टोपलीच्या आकाराचे छोटे जाळे असते. सामान्यत: रासायनिक द्रव्यांचा वापर करुन जेव्हा मासेमारी केली जाते तेव्हा हे जाळं वापरतात.

४) Lenkhang : मासे पकडण्याच्या विविध पध्दतीमध्ये हे मोठे जाळे वापरले जाते.

संघ व्हूक यामध्ये आधी रासायनिक / विषारी द्रव्यांचा वापर करुन माशांना मारलं जातं आणि त्यानंतर बाहेर काढलं जातं. काही वनस्पती विषारी द्रव्य म्हणून काम करतात; उदा. रुलेल, रुचेक, खांगडींग, कंगटेक, खियांझो, कामासा हुल्ह, न्गाहीह, कावमृ, झाऊरु, अन्सापुई, रुयेई, अव्हीक्रेह, राहनो, सैथेइराहसेन, अरु, किंवा केलमारुचा, ह्लिंगसी, व्हांग, पील इ.

नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर करुन काही साधने बनवून मिझो लोक मासेमारी करतात. उदा. ऐवत, न्हाकुई, न्गावीदाव्ह.

**ऐवत** – हे बांबूपासून बनवलेले साधन आहे, जे छोटे मासे व खेकडे पकडण्यासाठी वापरतात. यामध्ये एका बाजूने उघड्या तोंडाची घनगोलाकृती टोपली असते. या टोपलीच्या वरच्या बाजूला बांबूच्या पट्ट्यांनी बनवलेले नरसाळे असते; जे पाण्याच्या प्रवाहात अशा पध्दतीने ठेवले जाते की त्यामुळे छोटे मासे टोपलीत सहजपणे येऊ शकतील. आणि जे मासे आत आलेत ते बाहेर जाऊ शकणार नाहीत. ते नरसाळे काढता येण्यासारखे असल्याने नंतर माशांना व खेकड्यांना बाहेर काढणे सोपे जाते. पण ऐवत फक्त छोट्या नद्यांमध्येच वापरलं जातं, जिथे छोटे मासे पकडायचे असतात.

**न्हाकुई** – न्हाकुई म्हणजे माशांचा आकडा. खरंतर हा आकडा मिझो लोक स्वत: बनवत नाहीत; परंतु ते त्यांच्या शेजारील लोकांकडून बाजारातून आणतात. मग या आकड्यांना खुंटीसारखं काहीतरी लावून मासे पकडले जातात.

**न्गावीदाव्ह** – ही एक मासेमारीची गुंतागुंतीची पध्दत आहेत. गावातील सगळे लोक यात सहभागी होतात. यामध्ये काही पुरुष नदीच्या खालच्या भागात जाऊन ५-६ दिवसांपेक्षा कधीकधी जास्त दिवस तिथे राहून मासे पकडतात. पण आधी तिकडे गेल्यावर नदीकाठाला एक झोपडी बनवली जाते की ज्यात ते झोपू शकतात. त्या झोपडीत एका छोट्याशा जागेत ते भात शिजवून खातात. त्या झोपडीला 'न्गावीश्लाम' किंवा न्गावीबुक असे म्हणतात.

यानंतरचे महत्त्वाचे काम म्हणजे बांबू व टिंबर गोळा करुन साधने बनवली जातात. सर्वात पहिल्यांदा

मासेमारीसाठी नदीवर स्थानक बनवलं जाते. हे बनवण्यासाठी मोठे बांबू व टिंबर एका विशिष्ठ कोनात बांधले जातात. याच रचनेला 'नागर' असे म्हणतात. पाण्याच्या प्रवाहाने नागर हलू नये म्हणून भरपूर छोटे दगडगोटे रचले जातात. यालाच 'लंगरेंग' असे म्हणतात. यानंतर त्याला आधार म्हणून बाजूने टिंबर उभारले जातात.

हे झाल्यावर मग प्रवेशद्वार बनवले जाते. त्याला नाखी असे म्हणतात. यासाठी मोठमोठ्या बांबूंचा वापर करतात. हे बांबू एकत्र बांधून काही विशिष्ट अंतराने रचले जातात की ज्यामुळे नदीपात्रात असलेल्या स्थानकाला आधार मिळतो. हे ६ फूट रुंद आणि ५ फूट लांब असते. याच्या सगळ्यात मोठ्या भागाला एकेईएल असे म्हणतात, हे बांबूच्या पट्ट्यांनी बनवलेले असते. या पट्ट्यांची रचना काटकोनात करतात, तेव्हा त्याला ताहरँग असे म्हणतात. या ट्रॅपबाहेर दोन किंवा त्यापेक्षा जास्त छिद्रे असतात. याला Rawlruk म्हणतात.

वस्तीतील सगळ्यात मोठे घर जिथे सगळे मासे एकत्र ठेवले जातात, त्याला न्गावीपू असे म्हणतात. या घरात मासे मोजण्यासाठी एक भांडं असतं. त्याला Belrem असे म्हणतात. १ भांडे ३ किलो असा या लोकांचा साधारण अंदाज असतो. सगळ्या सभासदांना माशांचा समान हिस्सा दिला जातो.

या सगळ्याच पध्दती फार पूर्वीही लोक वापरत होते. परंतु आता मात्र सरकारच्या विविध धोरणांमुळे आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आता त्यांच्यात काही छोटे-मोठे बदल झालेले आहेत.

**धार्मिक साधने**

मिझो लोकांमध्ये प्रामुख्याने वन्य देवतांचे पूजन केले जाते. यालाच 'डेव्हील वरशिप' असे म्हणतात. मिझो समाजाचं स्वत:चं असं खास अस्तित्व टिकून राहिले आहे. ते याच कारणांमुळे की त्यांच्यात या पारंपरिक सणवारांमुळे एकात्मता टिकून राहते. आज मिझो समाजात स्थिरता असण्याचं कारण म्हणजे भौतिक संस्कृती आणि Non-material Culture या दोन्हींमध्ये झालेली वाढ आणि प्रगती. त्यांच्या या सणावारांच्या मागे असलेल्या दृढ मूल्यांमुळेच त्यांच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक गोष्टीत आपणास स्थिरता दिसते.

मिझो लोक अगदी रोजच्या वापरातली भांडी, अन्नधान्य ते घरापर्यंत सगळ्याच गोष्टी धार्मिक मानतात. मिझो लोकांचे धार्मिक सण २ गटात विभागले जातात.

एक की ज्यामध्ये फक्त दुष्ट आत्म्यांपासून रक्षण व्हावे म्हणून करतात आणि दुसरे म्हणजे ज्यात पूजा होते, आपणास माहीत नसलेल्या गोष्टींची, त्याला पठियान किंवा खाजंगपा किंवा खावझिंग पठियान असे म्हणतात. पहिल्या प्रकारात बावलपू विधी करतात; आणि दुसऱ्या प्रकारात साद्दत पूजा करतात.

**धार्मिक सणांच्या काही वस्तू पुढीलप्रमाणे**

**१) अनाहमांग :-** ही एक प्रकारची पूजा आहे, की जी खाजंगपा या देवाला पूजण्यासाठी केली जाते. 'अनाहमांगचा खरा अर्थ टाकून द्याव्या की अशा गोष्टी' असा आहे.

या पूजेत Kangtlaphei, Beirai, Pakong, Beikang, Maisa, Phiatla, Deuchhai, Bei, Phow vaw, Pawkho, Peureu, Hrokha व Api अशी भांडी वापरतात.

या सगळ्या गोष्टी घराच्या नमुन्यावर ठेवतात. किंवा टोपलीत किंवा छपराच्या खाली आणि मोठ्या पलंगाच्या वर टांगतात. मिझो समाजातील चापी लोक छपराजवळ टांगतात तर सियाहा लोक याबरोबरच अजून डाओ, पुग्री, झगा, निळ्या रंगाचे कापड, ब्रांझचे कडे, चेस्टनट पोल, बाण व भाता ज्यात २ बाण ठेवलेले

असतात, या सगळ्या वस्तूंचा या पूजेत समावेश करतात. ही पूजा फक्त खाजांगपिना देवतेसाठी करतात. सगळ्यात शेवटी अनाहमांग धुवून घरात ठेवले जाते. वाघ देवतेचे पूजन करण्यासाठी सुध्दा ही पूजा (Hnaihleu) न्हैंल्हऊ कुळाचे लोक करतात.

अनाहमांग मध्ये वापरलेल्या वस्तू पुढीलप्रमाणे -

१) **कांगटलाफेल –** या दोन लाकडी ताटल्या असतात, ज्या लाकडी साच्यात बसविलेल्या असतात. त्यांचा आकार डोक्यापेक्षा मोठा असतो. एका ताटलीत मांस व भात असतो आणि दुसऱ्यात तांदूळाचे पीठ असते.

२) **बैरल –** हे एक मातीचे बनवलेले पण मोठे आणि जाड फुलदाणीच्या आकाराचे भांडे असते.

३) **पॅकाँग –** पॅकाँग म्हणजे लगोर जी बांबूपासून बनवलेली असते.

४) **बैंकांग** (Beikang) – ही मातीची बशी असते ज्याचा उपयोग दारु पिण्यासाठी हे लोक करतात.

५) **मैसा** (Maisa) – हा बांबूपासून बनवलेला स्टूल असतो. त्यावर जंगली वनस्पती पसरविल्या जातात. देवतांना अर्पण केलेले, बळी दिल्यावरच त्या वनस्पतीवर ठेवले जातात.

६) **फयाटला** (Phaiatla) – ही एक मोठी फळी असते ज्याचा वापर खाजंगपा त्याला दिलेली आमटी पिण्यासाठी करतो.

७) **देऊच्छे** (Deuchhai) – ही लाकडाची चोटीशी खुर्ची असते. यावर बसूनच खाजंगपाला जेवण वाढतात. या जेवणात मांस व दारु यांचा समावेश असतो.

८) **बै** (Bei) – हे मातीचे पातेले असते ज्यात डुकराचे डोके शिजवले जाते.

९) **फाव्हाव पावखो** (Phawvaw Powkho) – जो बळी देण्याचे काम करतो त्याला जेवण पावखो म्हणजेच बांबूच्या टोपलीत दिले जाते.

१०) **पेऊरेऊ** (Peureu) – एका छोट्या लाकडी फ्रेमवर खाजंगपासाठी कापड लावले जाते आणि त्या शेजारी तंबाखूची चिलीमसुध्दा त्याच्यासाठी ठेवली जाते.

११) **होखा** (Hrokha) – दारु ठेवण्यासाठी ३ छोटी उभट आकाराची भांडी असतात आणि त्यातून दारु घेण्यासाठी पळ्या असतात.

१२) ॲफी (Aphi) – ही बांबूची चटई असते. ज्यावर अनाहमांगची पूजा मांडली जाते.

वरील या सगळ्या वस्तू अनाहमांगच्या पूजेत वापरल्या जातात.

**१) अर्केझियाक** (Arkeziak) – हा एक लांब पांढऱ्या कापसाचा धागा असतो ज्याच्या दोन्ही टोकाला लाल, निळ्या आणि पांढऱ्या धाग्यांचा गोंडा असतो. या दोरीला (Hranghrual) ऱ्हँघरुअरल म्हणतात. या दोरीला पीळ देताना शेळीचा केस या दोऱ्याला गुंडाळला जातो यालाच झावांगचल असे म्हणतात.

२० व्या शतकाच्या सुरुवातीला आवांगचल तरुण बायका मृतदेह सजविण्यासाठी वापरत असे. अशा अलंकृत वस्तू मृतदेह पुरल्यावर त्याची कबर सजवण्यासाठी वापरल्या जातात.

२) **बुहटलेई** (Buhtlei) – हा बांबूचा डाव असतो जो भात शिजवताना ढवळायला आणि नंतर वाढून घ्यायला वापरतात.

लग्नसमारंभात जो बळी दिला जातो त्याला बुहटलेईने मारलं जातं.

३) **बुकटे लेम** (Bukte Lem) – म्हणजे छोट्याशा वाडीची प्रतिकृती जी दगडांनी बनवलेली असते. यात पुढील गोष्टींचा समावेश असतो.

४) **अरपुईहमल** (Arpuihmul) - म्हणजे कोंबड्यांचे पंख. कोंबडीचे ४ पंख या प्रतिकृतीच्या ४ बाजूंना लावलेले असतात.

५) **थिंगसे न्हाय** (Thingse hnah) – हे बदामाच्या झाडांच्या जातीतले पान असते. याची ५ पाने या प्रतिकृतीवर ठेवतात.

६) **सकूह ह्मूल** (Sakuh hmul) – हो झाडाचे साल असते. ही साल या प्रतिकृतीची सीमा ठरवतात. जेव्हा गावात रोगांची साथ पसरते तेव्हा या प्रतिकृतीचा नैवेद्य दाखविला जातो. ही प्रतिकृती गावाबाहेर बनवही जाते आणि त्याचा नैवेद्य झाल्यानंतर ती प्रतिकृती जाळण्यात येते.

७) **बूंग लेम** (Bung Lem) – ही झाडाची प्रतिकृती असते. ही बांबूपासून बनवलेली असते. बळी देताना ही प्रतिकृती छतावर उभारली जाते.

८) **चाव्म्नू लीम** (Chawmnu Lim) – म्हणजे स्त्री भूत. असे मानले जाते की पूर्वीपासून टायफॉइड सारखे जे रोग होतात ते या स्त्री भूतामूळे होतात. अशा रोगांवर उपचार करण्यासाठी बावलपुई बळी देलेल्या प्राण्याचे पित्ताशय काढून चाण्म्नू लीम या देवतेला नैवेद्य दाखवितात.

९) **चांटियांग** (Chantiang) – हा एक प्रकारचा बाण असतो. बळीचा प्राणी मारण्यासाठी हा वापरला जातो. हा बाण पूजाऱ्याच्या हातात असतो. पुजारी हा बाण बळीच्या झाकडाव्ह भागावर म्हणजेच हृदयाच्या विरुद्ध बाजूला की जी पिळल्याने प्राण्याचा लगेच मृत्यू होतो तिथे मारतात. जर प्राणी ह्या पध्दतीने नाही मेला तर लाईचा पवित्र भाल्याने त्याला मारले जाते.

१०) **चावंडावल, नगेंची, ऱ्हूक** – चावंडावल म्हणजे शेळीचे केस काढून त्याला लाल रंग देऊन पुरुष ते डोक्यावर परिधान करतात. नगेंची किंवा ऱ्हूक शंकूच्या आकाराचे असून ते तांब्याचे असते. तसेच ते चावंडावलला जोडलेले असते. असा पोशाख युध्द जिंकून आल्यावर केला जातो.

११) **मातीची खेळणी** – प्राण्यांच्या प्रतिकृती आणि हत्यारे किंवा साधने मातीपासून बनवलेली असतात. ती वेगवेगळ्या बळींसाठी वापरली जातात. मासा, (gong) गाँग, मणी, (mithun) मिथुन इ. बावलपुई या बळी देण्याच्या पूजेत वापरतात.

या वस्तू नैवेद्य म्हणून वापरतात किंवा कधी कधी नैवेद्य ज्याला दाखवायचा ते म्हणून वापरल्या जातात.

१२) **फारथिंग सुईमूम्** – हे थोडं फार 'तूल' सारखचं असत. फक्त फरक एवढाच की हे फीर नावाच्या झाडापासून बनवितात. याचा उपयोग अंड्यांना छिद्र पाडण्यासाठी आणि सेलूफान (Seluphan) वर उभारण्यासाठी होतो.

१३) **हैते** (Haite) - हे भांडं भोपळ्याच्या जातीच्या झाडापासून बनवतात. हा विशिष्ट मिझो कप आहे. पूजेसाठी पाणी याच कपामधून आणण्याचा प्रघात आहे.

१४) **न्हँग** (Hnang) – विशिष्ट उभ्या पध्दतीने बांबू किंवा केनच्या पट्ट्या एकमेकांना बांधल्या जातात. त्यालाच न्हँग म्हणतात. घर बनविण्यासाठी याचा उपयोग होतो.

१५) **ह्लँग लेम मिलेम** (Hlang Lem Milem) – ही फार महत्वाची धार्मिक प्रथा आहे. ही प्रथा मुख्यत: मृत व्यक्तींना मान देण्यासाठी, त्यांच्याबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी असते. यामध्ये मृत व्यक्तींची प्रतिकृती बनवून त्याला छान कपडे, बांगड्या, मोत्याचे दागिने घालून, मांस व दारुचा नैवेद्य दाखवितात. त्यानंतर त्याला तिरडीवर झोपवून गावातून फिरवलं जातं. ही प्रतिकृती खरोखरीच मेलेल्या माणसाची असल्याने तिला मृत व्यक्तीच्याच नावाने संबोधतात.

१६) **ह्मूफिह** (Hmunphiah) – म्हणजे झाडू. हा झाडू विशिष्ट प्रकारच्या गवताने बनवितात. याला तसे फारसे धार्मिक महत्त्व नसून फक्त पूजेनंतर ती जागा स्वच्छ करण्यासाठी या झाडूचा उपयोग करतात.

१७) **इन लेम** (In Lem) - जसे बुकटे लेम तसेच इन लेम होय.

१८) **खुआंगलँग** (Khuanghlang) - यात नवरा-बायको थांगछुह हा महत्त्वपूर्ण धार्मिक विधी खुंगचावी या दिवशी करतात. या जोडीला आणण्यासाठी खुआंगलँग आसनाचा उपयोग केला जातो.

१९) **काव्हाई** (Kawvahai) - लाकडापासून पक्षाची प्रतिकृती तयार केली जाते. यालाच काव्हाई म्हटल्या जाते. त्याच्यासाठी गावातील एक झाड निवडले जाते. त्या झाडाला Thalanvwang थलॅनव्हँग म्हणतात.

२०) **लँपई** (Lampei) - हे मातीचं भांडं असते. युध्दातून शूर सैनिकांची जी डोकी आणली जातात त्यांना भाताचा नैवेद्य याच भांड्यातून दाखविला जातो.

२१) **लेचछवान/थिचछवान** (Lenchnawn/Thihchawn) – आधी म्हटल्याप्रमाणे शेळीच्या केसांना लाल रंग देऊन डोक्यावर घालण्यासाठी हे बनविले जाते.

२२) **ला सेन, वार, डम** (La Sen, Var, Dum) – हे कापसाचे धागे असून त्यांना लाल, पांढरा व काळा रंग दिला जातो. पूजेची जागा व पूजा सजवायलाही याचा उपयोग करतात.

२३) **लेंगलेप** (Leng lep) – हा छोटासा हिराच्या आकारासारखा झेंडा असतो, जो बांबू व कापसाच्या लाल, काळ्या व पांढऱ्या धाग्यापासून बनवतात. लुशाई जमात याचा पूजेत उपयोग करते.

२४) **मैचाम** (Maicham) - हे बांबूच्या पट्ट्यांपासून बनवलेले असते. त्याच्या ४ बाजूंना खांब असतात. याची रचना थोडीफार न्हँग सारखीच असते.

२५) **नोपुई** (Nopui) – भाताची दारु पिण्यासाठी हा कप वापरला जातो. यातून भाताची दारु पिण्याचा मान हा गावातील सगळ्यात जास्त शूर व्यक्तीचा असतो.

२६) **न्घालेंग नुपा** (Nghaleng Nupa) – म्हणजे मातीने बनवलेली माशांची जोडी. बावलपुई च्या पूजेत ही गंभीर आजारांचा नाश करण्यासाठी पूजली जाते.

२७) **फावगंलूंग** (Phawnglung) - हा दगड मिझोराम मधील सगळ्यात मोठ्या डोंगरावरुन घेतला जातो. लई जमातीमध्ये हा दगड देवाला मृतात्म्यांच्या सन्मानार्थ वाहिला जातो. या पूजेत तो दगड डोंगरावरुन काढून त्याच्या मागे प्राण्याचा बळी देतात.

२८) **सेल्फान** (Seluphan) – हा एक पूजेतला खांब असतो ज्यावर पाळीव गयाल नावाच्या प्राण्याचे डोके बसवलेले असते, सेल्फान म्हणजे एक प्रकारचे झाड असते ज्याला तिकडे थिंगसिया म्हणतात. या झाडाची वरची बाजू दुभागलेली असते. आणि हे जमिनीपासून ८ ते १० फूट उंचीवर असते. हे बनवणे व उभारणे यासाठी मोठ्या प्रमाणात पूजा होते.

२९) **रॉचेह** (Rawcheh) – ही एक बांबूची काठी असते. जी दैबॉल च्या पूजेत वापरतात. त्याच्या वरच्या बाजूला चीर देऊन त्यात कापूस व लोखंडाचा थोडासा कीस घातलेला असतो, त्याच्या बाजूंना चरे दिलेले असतात आणि त्याची खालची बाजू खड्ड्यात रोवलेली असते.

३०) **साहलॅम** (Sahlam) – ह्या झाडावर युध्दात मारलेल्या शत्रूंची डोकी टांगून ठेवतात.

३१) **श्लेंग के नैलो** (Thleng Ke Neilo)– श्लाव्हांग झाडापासून बनवलेली ही पसरट बशी असून बऱ्याच पूजांमध्ये ती वापरली जाते.

३२) **थिंगसेह** (Thingserh) – जो योध्दा युध्दातील शत्रूंच्या डोक्याची पूजा करतो, त्याच्या घराजवळ हे झाड उभारले जाते. या झाडाच्या मागे डाओ व तांदूळाच्या दारुचे एक भांडे ठेवले जाते. डाओ म्हणजे एक वस्तू जी घेऊन गावातील सगळ्यात धाडसी माणूस या झाडाला धडकतो; यातून त्या माणसाची गावासाठी काहीही करण्याची जिद्द व आत्मीयता दिसते.

३३) **तुईरुआल** (Tuirual) – हा स्त्रियांच्या डोक्यावरील पोशाख असतो, जो लाल, पांढरा रंग दिलेल्या कापसापासून बनविला जातो. सामान्यत: हा पोशाख युध्दातून आणलेल्या डोक्यांच्या पूजेच्या वेळी केला जातो. लतुई या कापसाचे ३ धागे एकत्र बांधून तुईरुआल बनवतात.

३४) **तूल** (Tul) – तूल म्हणजे खिळा. याचे एक टोक तीक्ष्ण असते. फूलरुआ नावाच्या बांबूपासून बनविला जातो. प्राण्याला बळी देताना याचा उपयोग होतो. प्राण्याच्या हृदयाच्या विरुद्ध बाजूला पिळण्यासाठी हे वापरले जाते. याशिवाय बळीचा जो भाग नैवेद्य म्हणून देवाला किंवा आत्म्यांना देतात त्याच्या सोबत तूलही ठेवले जाते.

३५) **थेंबू** (Thembu) – यात वेगवेगळ्या जाडीच्या बांबू व टिंबरच्या पट्ट्या असतात. मिझो बायका पूजेत सुशोभनासाठी याचा उपयोग करतात.

३६) **थैबेल** (Theibial) – हा बांबू जमिनीत घट्ट बसवलेला असतो. हे सुध्दा लुशाई डाईबाल च्या पूजेत बसवतात.

३५) टिफांग (Tifang) : बळीच्या प्राण्यावर या भांड्यात ठेवलेले पाणी व तांदूळ शिंपडतात. विधी करणारी व्यक्ती या भांड्यातील पाणी तोंडात घेऊन बळीच्या प्राण्यावर त्याचा फवारा चुळेप्रमाणे उडविते.

३७) **झावंगचल** (Zawngchal) – हा एका सणाच्या वेळी शेळीच्या केसांना रंग देऊन डोक्यावर परिधान करण्याचा पोशाख असतो.

३८) **झूपेंग** (Zupeng) – गार्ड नावाच्या झाडाच्या लाकडापासून दारु ठेवण्यासाठी हे भांडे बनवले जाते. अशाप्रकारे त्यांची रोजच्या वापरातलीच भांडी ते सणवारात व पूजेत वापरतात.

• • •

# मिझोरामचे मुख्यमंत्री श्री झोरामथांगा यांचे बीज भाषण

21 {S>g|~a 2002 amoOr Zdr {X,,r `dWb gSnP Pmboë`m 50 i`m

amiQ´>r` {dH$mgn[afXoV_m._w»`_S´Í`mßZr_mßS>bobo {dMma ...

राष्ट्रीय विकास परिषदेच्या या अत्यंत महत्त्वाच्या चर्चासत्रात सहभागी होताना मला खूप आनंद होत आहे. येथे आपण दहाव्या पंचवार्षिक योजनेच्या बांधिलकी, जबाबदाऱ्या आणि धोरणे व कार्यक्रमांचा आढावा घेणार आहोत. आपण पाहिलेच आहे की, देशाच्या प्रगतीकरता अंगिकारलेल्या योजना आणि केलेली कृति यामुळे सामान्य जनतेच्या जीवनमानात महत्त्वाचा बदल झाला आहे. अजून एक समाधानाची गोष्ट आहे की, योजना आयोगाने केलेल्या शिफारसींच्या अंमलबजावणीने साक्षरतेचा दर वाढवणे, आरोग्य व सामाजिक पायाभूत सुविधांमध्ये सुधार व गरिबी निर्मूलनामध्ये यश मिळाले आहे. देशाची अर्थव्यवस्था प्रगतीपथावर आहे, मी सर्व धोरण नियोजकांचे अभिनंदन करतो.

दहाव्या पंचवार्षिक आराखड्याच्या योजना आणि कृतिकार्यक्रमांच्या संदर्भात मी राष्ट्रीय विकास परिषदेचे पुढील मूलभूत घटकांकडे लक्ष वेधू इच्छितो.

### १. शांतता आणि स्थैर्य

या महनीय परिषदेतील मान्यवर सदस्य माझ्याशी या गोष्टीवर सहमत होतील की सर्वप्रकारच्या विकासाकरिता शांतता आणि स्थैर्य या दोन गोष्टी अग्रक्रमाने गरजेच्या आहेत. आपण पाहिलेच आहे की, विविध हितसंबंधी गट जे जात, वंश व धर्मावर आधारीत आहेत, त्यांमध्ये तणाव वाढत आहे. अनेक क्षेत्रात नाराज गटांनी हातात शस्त्र घेतली आहेत आणि अनेक गुप्त गट विनाशकारक कृति, खंडणी व गुन्हेगारी स्वरुपाच्या कामांशी जोडले गेले आहेत. आपल्या लोकांपैकी निष्पाप लोकांचा मोठा गट या कारवायांमुळे दुःख व यातना भोगत आहे. उत्तर पूर्व राज्ये त्यांच्या दुर्गमतेमुळे या सर्व बाबींना जास्ती वाईटरित्या अनुभवात. म्हणून मी राष्ट्रीय विकास परिषदेचे आणि भारत सरकारचे लक्ष वेधू इच्छितो की त्यांनी या भागाचा विकास होण्याकरता, संघर्ष-व्यवस्थापनेत गंभीरपणे लक्ष घालावे. संघर्ष कमी करणे हा भारत सरकार व राज्यप्रशासनाच्या विकास प्रक्रियेचा एक अविभाज्य भाग झाला पाहिजे. उत्तर पूर्व विभागाच्या बाबतीत, सर्व प्रमुख गुंतवणूकदार हे उठावात्मक धोरणामुळे दूर जातात व जे प्रकल्प आहेत ते खंडणी व अपहरणामुळे नुकसानीत आहेत. परदेशी अनुदान संस्था आणि गुंतवणूकदार या भागाकडे कधीच आकर्षित झाले नाहीत.

### २. प्रगती व गरिबी निर्मूलनाचे उद्दिष्ट

नियोजन आयोगाला जाणीव आहे की उत्तर पूर्व विभागातील राज्यांचा वृद्धीदर हा राष्ट्रीय वृद्धी ८% पेक्षा भरपूर कमी राहील. याठिकाणी अनेक अनुलंघनीय अडथळे आहेत. औद्योगिक विकास असमाधानकारक आहे. आपली जमा-ठेव कमी आहे. दळणवळण निकृष्ट आहे आणि शेजारी राष्ट्रांबरोबरचे संबंध समाधानकारक राहिले नाहीत. भारताच्या मुख्य भूमी बरोबर उत्तर पूर्व राज्यांना आर्थिकरित्या जोडणारा मार्ग बांगलादेशातून जातो; परंतु बांगलादेशासोबत खराब संबंधामुळे वापरता येत नाही.

वास्तविकरित्या भारत सरकारने या बाबीकडे गंभीरपणे लक्ष देऊन उत्तर पूर्व विभागामध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक वृद्धी करणे गरजेचे आहे. आमचे लक्षित ध्येय १५% असून एकूण दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाचे प्रमाण कमी करणे या सुद्धा मुद्यांकडे गंभीरपणे आणि व्यावसायिकदृष्ट्या लक्ष न दिल्यास ते साध्य होणार नाहीत. वास्तविक नियोजन आयोगाने, शुक्ल समितीच्या स्वरुपावर आधारीत विशेष आयोगाचे गठन या विशिष्ट चिंताजनक मुद्यांचे परीक्षण करण्याकरिता करावे.

**३. उत्तर पूर्व विभागांचा विकास व दक्षिण आशियाई देशांबरोबरचे संबंध**

उत्तर पूर्व विभागाचा खऱ्या अर्थाने विकास हा केवळ दक्षिण आशियाई देशाबरोबर वर्धित व्यापारी संबंध प्रस्थापित केल्यानेच होऊ शकतो. आता करारातील उद्दिष्ट साध्य करण्यासाठी म्यानमारसारख्या शेजारी देशांबरोबर रेल्वे, रस्ते व जलमार्ग विकसित केल्यानेच होऊ शकते व पुढे जाऊन आशिया खंडातील प्रस्तावित आर्थिक महासत्ता जसे दक्षिण पूर्वेकडे थायलँड व मलेशिया आणि उत्तर पूर्वेकडे चीनबरोबरचे संबंध प्रस्थापित करण्यास मदत होऊ शकते. याकरिता मी विनंती करू इच्छितो की, भारत सरकारने हे अंतिम ध्येय डोळ्यासमोर ठेवून रस्ते, रेल्वे व सागरी मार्ग विकासाकरिता विशेष निधीची तरतूद करावी. म्यानमारबरोबर बहुमार्गीय दळणवळण वाढविण्याकरिता प्रस्तावित राईट्स प्रकल्पाकडे विशेष लक्ष द्यावे.

**४. उत्तरपूर्व विभागाकरिता प्रधानमंत्री पॅकेज**

उत्तर पूर्व विभागाच्या वर्धित विकासासाठी मा. प्रधानमंत्री महोदयांनी उचललेल्या पावलांकडे भारत सरकारने लक्ष केंद्रित करावे. २४ डिसेंबर १९९७ च्या धोरणात्मक मसुद्यावर विस्तारपूर्वक व सखोल विचार केला पाहिजे. कृषिनिर्यात क्षेत्र, फुड पार्क, इ.पी.आय.पी., आय.जी.सी. यांसारख्या विकास प्रकल्पांकरिता उपलब्ध केंद्रिय सहाय्य हे दहा वर्षापूर्वीच्या मार्गदर्शक तत्त्वांवर आधारीत आहे, त्यामध्ये बदल करुन ही तत्वे अद्ययावत करणे गरजेचे आहे. मी नियोजन आयोगाला या सर्व केंद्रिय सहाय्याच्या योजनांचा आढावा घेण्यासाठी आमंत्रित करतो. चालू असलेल्या आय.जी.सी. व इ.पी.आय.पी. योजना जरी अ.सा.ई.ड. सारख्या नविन योजनेत विलीन होणार असल्या तरी केंद्राकडून मिळणारे सहाय्य सध्याच्या पातळीवर किंवा त्यापेक्षा जास्ती प्रमाणात व निरंतर मिळत राहावे.

**५. साक्षरता व बेरोजगारी**

केरळ व मिझोराम या दोन राज्यांतील साक्षरतेचे प्रमाण इतर राज्यांच्या तुलनेत जास्ती आहे. परिणामी सुशिक्षित तरुणांना रोजगार उपलब्ध करुन देण्याची समस्या मोठ्या स्वरुपाची आहे. वस्तुत: मिझोराम राज्याने यापूर्वीच बेरोजगारांचा मोठा अनुशेष असून या समस्येमधील राज्यात गुंतवणूक न होणे व शासन यंत्रणेत भरती प्रक्रिया मंदावल्याने गोंधळात वाढ झाली आहे. या कारणास्तव सुशिक्षित बेरोजगारांच्या समस्या निवारण्यासाठी एक वेगळे नियोजन करण्याची गरज आहे. आपण आधीच बघितले आहे की, या बेरोजगारीचा परिणाम म्हणून उत्तर पूर्व विभागात उठावाची पार्श्वभूमी तयार झाली आहे.

**६. मालमत्ता देखभाल**

यापूर्वीच्या योजनांच्या कालावधीत निर्माण झालेल्या मालमत्तेची देखभाल करण्याकडे पुरेसे लक्ष केंद्रित केले पाहिजे. या योजना आयोगाच्या शिफारसीला राज्य सरकारने पूर्ण पाठिंबा दिलाआहे. वास्तवत: बहुतेक मोठ्या आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम राज्यांना त्यांच्या मालमत्तेची देखभाल करण्याकरिता पुरेसा निधी उपलब्ध करुन घेण्याकरिता पुरेसा वाव आहे; परंतु बहुतेक उत्तर पूर्व राज्यांना ज्यामध्ये विशेष प्रवर्गातील राज्यांचा समावेश

आहे, अल्प संसाधने असल्याने मालमत्ता देखभाली-करिता पुरेसा निधी उपलब्ध करुन घेता येत नाही. दुसऱ्या बाजूला, अकराव्या वित्त आयोगाने केलेली तरतूद ही या मालमत्तेची देखभाल करण्यासाठी अपुरी पडते. मी योजना आयोगाला नम्रपणे विनंती करु इच्छितो की, त्यांनी या बाबींचा आढावा घ्यावा व गरज असेल तर बाराव्या वित्त आयोगाच्या सल्ल्याने ही समस्या सोडविण्यासाठी विशेष तरतूद करावी. योजना आयोग काही प्रमाणात नियोजन निधी हा मालमत्तेची देखभाल करण्यासाठी राखीव स्वरुपात ठेवण्याविषयी पर्यायी विचार करु शकतात.

### ७. कृषी व बागायती विकास

ही समाधानाची बाब आहे की, योजना आयोगाने सध्याच्या मर्यादा आणि शक्यतांवर आधारीत कृषी धोरणाची गरज मान्य केली आहे. हा दृष्टिकोन उत्तरपूर्व विभागाच्या कृषि व बागायती विकासाच्या दृष्टीने समयोचित असून या घटकांचे अंत:सामर्थ्य अजून योग्यपणे चाचपडता येईल. जरी हा भाग अन्नधान्यांच्या उत्पादनात कमी असेल, तरीही हा भाग कृषी व बागायती उत्पादनांसाठी हितकारी आहे. जर योग्य लक्ष दिले तर या क्षेत्रांमध्ये सुधारणा करणे शक्य आहे.

### ८. औद्योगिक विकास

संपूर्ण उत्तर पूर्व विभाग व मिझोराम औद्योगिक विकासापासून दूर आहे. मिझोराममध्ये मध्यम किंवा अवजड उद्योग नाहीत. दळणवळणाच्या मर्यादा, औद्योगीकरणाचा निम्नस्तर, उठावात्मक परिस्थिती, निम्न उद्योगशीलता आणि उर्जेची कमतरता हे या परिस्थितीला काही प्रमुख जबाबदार घटक आहेत. याकरता संपूर्ण उत्तर पूर्व विभागाच्या औद्योगिक धोरणाचा आढावा घेणे आणि या करता संपूर्ण उत्तर-पूर्व विभागाच्या औद्योगिक धोरणाचा व डिसेंबर १९९७ मध्ये भारत सरकारने उत्तर पूर्व विभागाकरिता नविन औद्योगिक धोरणाची घोषणा करुन घेतलेल्या पुढाकाराचा आढावा घ्यावा. ह्या धोरणांना आणखी मजबूत करण्याची गरज आहे. सध्याचे आयात-निर्यात धोरण, उत्तर पूर्व विभागातील समस्यांवर लक्ष केंद्रित करुन सुधारणे अपेक्षित आहे. वित्त व उद्योग मंत्रालयाच्या नियोजित आराखड्यामध्ये ह्या सुधारणा करण्यावर भर देण्यात यावा.

### ९. केंद्र व राज्याचा खर्च विभागणी प्रमाणामध्ये शास्त्रीय तत्वावर आधारित सुधारणा करणे.

आपण वेळोवेळी बघत आलोय की सध्याच्या खर्च विभागणी प्रमाणाच्या सूत्रानुसार केंद्र आणि राज्य सरकारकडून उपलब्ध होणाऱ्या निधीमध्ये ५०:१० ते ९०:१० इतक्या प्रमाणात तफावत दिसते. ही तफावत विशेष प्रवर्गातील राज्यांची परिस्थिती लक्षात घेऊन समान तत्त्वाने सर्व प्रकल्पांकरिता ९०:१० या प्रमाणात केंद्र पुरस्कृत योजनांकरिता ठेवावी. राष्ट्रीय विकास परिषद व योजना आयोग ह्या संदर्भात मार्गदर्शन करु शकतात. अशा प्रकारची मदत पायाभूत सुविधा व संसाधनांचा अभाव असणाऱ्या राज्यांना केंद्रशासित राज्यांच्या तुलनेत उपयोगी ठरु शकते.

### १०. उत्तर पूर्व विभागाकरिता उदारीकरणाच्या धोरणाचा अंतर्भेद

उत्तर पूर्व विभागातील लहान राज्ये, ज्यांच्यामध्ये गुंतवणूक आमंत्रित करण्याची क्षमता नाही आणि तयार माल निर्यात करण्याला वाव नाही. त्यांना भारत सरकारच्या उदारीकरणाच्या धोरणाचा फायदा उठवणे शक्य झालेले नाही. वस्तुत: पायाभूत सुविधा विकास आणि उद्योग विकासासंदर्भात प्रत्यक्ष असे दिसून येते की, उदारीकरणाच्या धोरणाने सरकार नियंत्रित प्रतिष्ठापना व उद्योग विकासापासून उत्तरपूर्व विभागाला वंचित ठेवले आहे.

**११. केंद्राच्या उर्जा प्रकल्पात राज्याचा हिस्सा**

सध्याच्या व्यवस्थेमध्ये, ज्या राज्यामध्ये केंद्र पुरस्कृत उर्जा प्रकल्पात निर्माण होणाऱ्या उर्जेचा १२% इतका भाग मिळण्यास ते राज्य हक्कदार आहे. ह्याचे पुनर्विलोकन राष्ट्रीय विकास परिषद तसेच भारत सरकार द्वारे होऊन हा हिस्सा कमीतकमी २०% पर्यंत तरी वाढला पाहिजे. ही वाढ उत्तर पूर्व विभागावर भारत सरकारने विशेष लक्ष केंद्रीत केल्याने निश्चित करेल.

**१२. निधीचे विभागीय वाटप व निधी राखून ठेवण्याच्या नियमात लवचिकता / शिथिलता**

हे बघण्यात येते की योजना आयोग निधीचे विभागीय वाटप व निधी राखीव ठेवण्याबाबतच्या नियमांबाबतचे धोरण कडकपणे राबवते. ह्या कडक धोरणांमुळे राज्यांना निधीचे विभागीय समायोजन करणे अशक्य होऊन बसते. वित्त व्यवस्थेच्या योजनांमध्ये मोठ्या प्रमाणावर विभागीय राखीव निधी ठेवण्याचे सुद्धा असेच परिणाम होतात. म्हणून योजना आयोगाला विनंती आहे की, त्यांनी विभागीय निधी वाटप आणि राखीव निधीबाबत काही प्रमाणात तरी शिथिलता द्यावी. सध्याच्या केंद्रिय मार्गदर्शक तत्वांमध्ये सुद्धा विविध योजनांसंदर्भात अशीच शिथिलता द्यावी, ज्यायोगे स्थानिक किंवा विभागीय गरजांनुसार निधीचा वापर करता येईल.

**१३. वर्धित नियोजन आराखडा**

योजना आयोगाने उशीरा का होईना काही केंद्र पुरस्कृत योजना व विशेष क्षेत्रीय योजना जसे प्रधान मंत्री ग्राम योजनांचा अंतर्भाव संपूर्ण राज्याच्या नियोजन आराखड्याचा कक्षेत केला आहे. ज्याचा परिणाम म्हणून हा आराखडा वर्धित झाल्यासारखे वाटते. या प्रक्रियेत प्रत्यक्ष नियोजन आराखडा मागील आराखड्यांच्या तुलनेत फारसा वाढलेला नाही. म्हणून नविन कृतिचे नियोजन करताना निधीचे वितरण हे नियोजन आराखड्याच्यापेक्षा वेगळे करावे. योजना आयोगाला विनंती आहे की त्यांनी ह्यावर यथार्थपणे पुनर्विचार करावा.

**अव्यपगत संचित निधी अंतर्गत शांतता लाभांश**

मा. प्रधान मंत्री महोदयांनी वित्त मंत्रालयांतर्गत गठीत अधिकाऱ्यांचा समितीचा अहवाल मान्य केला आहे. ज्यात मिझोराम राज्याला नियोजित व अनियोजित अर्थसंकल्पाखाली शांतता लाभांश देण्याचा प्रस्ताव आहे. भारत सरकारने अनियोजित निधी अंतर्गत लाभांश देण्याचे वचन पूर्णत: पालन केले आहे, परंतु अव्यपंगत संचित निधी अंतर्गत शांतता लाभांश देण्याच्या वचनाची अद्याप पूर्तता झालेली नाही. योजना आयोगाकडून शांतता लाभांशाची नियोजन आराखड्याअंतर्गत रक्कम निधी करण्याची पद्धत योग्य नसल्याने, मिझोराम राज्याला विकास कामांसाठी उपयुक्त भरीव रकमेच्या संसाधनांपासून वंचित रहावे लागले आहे.

**१५. बांबूच्या उपयोगाकडे लक्ष देण्याची गरज**

उत्तर पूर्व विभागातील राज्यांच्या दृष्टीने व विशेषत: मिझोरामसाठी बांबू हे सर्वाधिक प्रमाणात उपलब्ध असणाऱ्या नैसर्गिक संसाधनाचा भाग आहे. सुयोग्य पध्दतीने तयार केलेले धोरण आणि कृतिकार्यक्रम तयार करण्याची गरज आहे. बांबू ह्या उपलब्ध नैसर्गिक संसाधनाचा उगम उपयोग उत्तर पूर्व राज्यांच्या आर्थिक विकासास चालना देण्यासाठी होईल. बांबू संबंधित विशेष प्रकल्पांकडे लक्ष केंद्रीत करुन योजना आयोगाने योग्य निधीचे प्रावधान करावे. अशा प्रकारे वेध घेतल्यानंतर मी मा. पंतप्रधान महोदयांनी मला ह्या महनिय मंचावर माझे विचार व्यक्त करण्याची संधी दिल्याबद्दल त्यांचे आभार मानतो.

*(मराठी अनुवाद : डॉ. शैलेश दळवी, सुशिल कहात)*

• • •

# मिझोरामचा विकास : एक दृष्टीकोन

ईशान्य भारताबाबतचे विकासाचे धोरण हे खऱ्या अर्थाने १९६० मध्ये डॉ. वेरीअर एल्वीन यांनी स्पष्ट केले. आदिवासी प्रदेशाचा व आदिवासी लोकांचा विकास हे एक वेगळे आव्हान आहे. आपल्या बऱ्याचशा राष्ट्रीय नेत्यांनी यावर जोर दिला आहे. त्या विषयाला महत्त्व दिले आहे. आसामचे माजी राज्यपाल एस. फजल आली यांच्या शब्दात विकासाचे मुलभूत तत्वज्ञान पुढील प्रमाणे सांगता येईल.

१) ईशान्य भारतातील लोक हे संवेदनशील मनाचे आणि बुध्दीमान आहेत. पण बाहेरील जगाशी त्यांचा फारसा संबंध न आल्यामुळे ते थोडे बेसावध राहतात. पण, या साऱ्या गोष्टी त्यांच्या मनाचा मोठेपणा, मैत्रीपूर्ण संबंध, उत्तम आदरातिथ्य यामुळे झाकोळून जातात. हे लोक निसर्गाच्या सानिध्यात जीवन जगण्याच्या आपल्या साध्या जीवनशैलीबाबत खूपच चौकस आणि बुध्दीमान आहेत.

२) आपण त्यांना कमीत कमी वेळेत जास्तीत शिकवण्याच्या हेतुने आणि त्यांची मनापासून सेवा करण्याकरता त्यांच्या संपर्कात राहणे गरजेचे आहे. त्यांना असे वाटले पाहिजे की त्यांच्या सुखसमृध्दीमध्ये वाढ होण्यासाठी आपण त्यांना प्रेरित करत आहोत. आपण जर त्यांची पारंपरिक जीवनशैली बदलण्याचा प्रयत्न जोरकसपणे चालवला तर त्यांची अशी धारणा होईल की आपण त्यांची संस्कृती नष्ट करत आहोत.

३) हे आपले कर्तव्य आहे की आपण पुढे होऊन आदिवासींना भेडसावणाऱ्या समस्या दूर करायला हव्यात आणि त्यांच्या सुखसमृध्दीसाठी मनापासून काहीतरी करायला हवं. विविध प्रकल्पांमुळे त्यांची अस्मिता, विश्वास हे धोक्यात येणार नाही हे बघितले पाहिजे. या प्रकल्पांपेक्षाही महत्त्वाचे हे आहे की, या प्रकल्पांचा त्यांच्यासाठी होणारा उपयोग त्यांना समजावून सांगणे आणि त्यांना त्यात सहभागी करुन घेणे. काही मोजक्या योजना चांगल्या पद्धतीने राबविण्यात आल्या तर त्यामुळे आदिवासी समुदायाच्या सहकार्यामध्ये सकारात्मक बदल होऊन त्यांचा उत्साह द्विगुणित होईल, त्यामुळे त्यांच्यात परस्पर सहकार्य आणखी वाढेल.

**कृषीविकास**

शेती हा मिझोराम मधील प्रमुख व्यवसाय असून सुमारे ७०% लोक येथे शेती करतात. येथील शेती आधुनिक पध्दतीची नसून 'झूम' पध्दतीची किंवा जमिनीवरील झाडे-झुडपे जाळून शेती करण्याची जुनी पध्दत येथे प्रचलित आहे. झूम पध्दतीच्या (शेतीसाठी नेहमी जागा बदलणे) शेतीमुळे नैसर्गिक साधनांची मोठ्या प्रमाणावर हानी होत असल्यामुळे त्यांनी स्थिर पध्दतीची शेती करावी यासाठी शासन प्रयत्न करत आहे. ऐझॉल शहरापासून ३० कि. मी. अंतरावरील ऐबॉक येथे अशा पध्दतीचा प्रकल्प राबविण्याच्या दिशेने काम चालू आहे. पण या धोरणामुळे आपण आपले काम गमावून बसू असे काही शेतमजुरांना वाटत आहे. त्यामुळे सुतारकाम, शिवणकाम, रेशीम उत्पादन, दुग्धोत्पादन, हातमाग - अशा व्यवसायांना अनुदान देऊन सुरु करणे आवश्यक आहे.

दळणवळणाच्या अपुऱ्या साधनांमुळे येथील शेतकरी बाजारामध्ये जाऊन अन्नधान्य विकण्याच्या

कामात फारसे उत्सुक नसतात. तसेच या प्रदेशात उन्हाळ्यामध्ये पाणी टंचाईची समस्या गंभीर रूप धारण करत असल्यामुळे लोकांना विहीरीच्या पाण्यावरच अवलंबून राहावे लागते. परंतु वीज देखील फारशी उपलब्ध होत नसल्याने विहिरीतील पाणी काढण्यावर मर्यादा येतात.

नजीकच्या भविष्यकाळात पर्यावरणाला अनुकूल असे धोरण ठेवून उत्पन्न आणि उत्पादनाची प्रत यात दर्जेदार सुधारणा करण्यावर भर देणे आवश्यक आहे. याबाबत झूम पध्दतीची शेती करणाऱ्यांकडून आवश्यक ते सहकार्य घेता येईल तसेच याविषयात काम करणाऱ्या संस्थांचीही मदत घेता येईल. या विषयातील तज्ञ व्यक्ती वृक्षसंवर्धन, पशुपालन, रेशीम उत्पादन, पीक पध्दती, पावसाच्या पाण्याचा पुनर्वापर, पशुपालन पूरक इतर व्यवसाय असे कार्यक्रम राबवू शकतात.

**औद्योगिकरण**

सातव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत शासनाने मिझोराममध्ये मोठे आणि मध्यम उद्योग स्वत: सुरु करण्याच्या कामात पुढाकार घेतला होता. तसेच, लघुद्योग आणि कुटीरोद्योग खाजगी सहभागातून सुरू करण्यावर भर दिला होता. हे सारे काही औद्योगिक खात्याच्या प्रोत्साहनपर योजनांच्या सहकार्यामधून होऊ शकले. त्याचा परिणाम म्हणून 'मिझोराम अन्न आणि पूरक उद्योग सहकार्य संघटना' (MIFCO) ची स्थापना औद्योगिक संचालनालयाच्या अखत्यारीत स्वतंत्र विभाग स्थापन करुन झाली.

MIFCO ची ही संकल्पना मिझोराम सरकारच्या तीव्र इच्छाशक्तीतून निर्माण झाली आहे. मिझोराममधील मर्यादित नैसर्गिक साधनांचा व्यवस्थित उपयोग करुन त्यातून लोकांच्या सुख-समृध्दीमध्ये भर पडावी हा त्यामागे विचार होता. कृषी आणि अन्नधान्य पूरक इतर व्यवसाय हे जरी त्यांच्या उपयुक्ततेमुळे प्राधान्यक्रमानुसार अगदी सुरुवातीचे असले तरी MIFCO च्या प्राधान्यक्रमानुसार खालील कृतींचा देखील त्यात समावेश होतो.

अ) अन्न आणि भाज्या प्रक्रिया उद्योग

ब) अन्नधान्याच्या गिरण्या (मिल्स)

क) कुक्कुटपालन, मांसाहारी पदार्थांची निर्मिती व शीतकरण

ड) शासकीय, खाजगी, वैयक्तीक, संस्थेच्या किंवा कंपनीच्या अन्न आणि पूरक उद्योगांना आर्थिक सहकार्य करणे.

सध्या MIFCO मशरूम उत्पादन, कुक्कुटपालन, मक्याचे प्रक्रिया उद्योग असे विविध प्रकल्प चालवत आहे.

**औद्योगिकरणास प्रतिकूल ठरणारे घटक :**

अ) परिपूर्ण आणि परिणामकारक अशा औद्योगिक धोरणाचा अभाव.

ब) पायाभूत सुविधा आणि पूरक सेवांमधील कमतरता.

क) आवश्यक कच्चा माल आणि बांधकाम साहित्याचा अभाव.

ड) दळणवळणाची महाग साधने आणि अपुरा वीजपुरवठा.

इ) विपणन (बाजारव्यवस्थेतील) क्षेत्रातील पाठबळाचा अभाव

ई) उद्योगी लोकांना मदत करण्यासाठी आवश्यक त्या माहितीची कमतरता.

ड) संपर्काच्या साधनांमधील उणिवांचा परिणाम म्हणून तंत्रज्ञान व विपणनविकासाच्या माहिती विषयी कमतरता जाणवते.

ऊ) मिझोरामच्या बाहेर राहणाऱ्या लोकांना अंतर्गत परवाने न देण्याचे धोरण.

ए) दहशतवादामुळे विस्कळीत झालेली सामाजिक – राजकीय व्यवस्था.

ऐ) प्रोत्साहन देणाऱ्या संघटनांकडून औद्योगिकरणाच्या योजनांची परिणामशून्य अंमलबजावणी.

ओ) अनुभवी आणि प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचा अभाव.

औ) खेळत्या भांडवलाची कमतरता.

ग) उत्पादनाचे जुने तंत्रज्ञान आणि गुणवत्ता नियंत्रणाचा अभाव.

ध) औद्योगिकरणातून मिळणाऱ्या फायद्यांबाबत माहितीचा अभाव.

**लघुद्योगांच्या बाबतीत**

नैसर्गिक साधनांचा विचार करुन लघुद्योगांच्या माध्यमातून स्थानिक गरजा पूर्ण करण्यासाठीच्या धोरणाला मिझोराममध्ये बराच वाव मिळू शकतो. त्यामुळे लघुद्योगांची सुध्दा भरभराट होईल. त्याची काही उदहारणे पुढीलप्रमाणे आहेत.

१) या भागात अद्रक (आले) ची शेती मोठ्या प्रमाणावर केली जाते. ४ ते ५ मध्यम स्वरुपाच्या प्रक्रियांमधून अद्रक जपून ठेवता येते. अद्रकापासून प्राप्त होणाऱ्या तेलाचा उपयोग सुगंधी द्रव्ये आणि औषधांमध्ये करता येऊ शकतो.

२) जवळपास ३००० टन मिरचीचे उत्पादन मिझोराममध्ये होते. इतर राज्यांना मिरची निर्यात करण्यापेक्षा मिरचीची पावडर येथे तयार करुन ती इतर राज्यांना पुरवणे अधिक हितकाकरक राहील.

३) कृषी उत्पादनांमधून औद्योगिकरणाला चालना देण्यासाठी बराच वाव आहे. जसे केळी व केळी पासून तयार होणारे चिप्स, पावडर इत्यादी.

४) अननस, संत्री, पपई इत्यादी फळांवरील प्रक्रिया आणि त्यांचे पॅकिंग करणे.

५) केळीच्या वाया जाणाऱ्या सालींपासून फायबर आणि स्टार्च तयार करणे.

६) सध्या फायबर हे अननसाच्या पानांपासून तयार केले जाते. ही पाने मऊ, टिकाऊ आणि चमकदार असल्यामुळे रेशमाप्रमाणे त्यापासून कपडे तयार होऊ शकतात.

७) मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असलेला बांबू कागदाच्या उद्योग निर्मितीला प्रोत्साहन देऊ शकतो.

८) छोट्या प्रमाणावरील साखरेचे उद्योग, लाकूड कापण्याचे उद्योग यांनी निर्यात व्यवस्थापनाशी समन्वय साधणे आवश्यक आहे.

९) सुगंधी द्रव्ये आणि तेले आपल्या रोजच्या जीवनात एक महत्त्वाची भूमिका बजावतात. सिट्रोनेला, पामरोझा, लिमॉनगास, टर्पेंटाईन, राळ यांना मोठ्या प्रमाणावर वाव आहे. सुगंधी आणि आर्थिक उत्पन्न मिळवून देणाऱ्या पिकांची शेती तसेच कृषीउत्पादनावर आधारित प्रक्रिया उद्योगांची स्थापना येथील लोकांच्या सामाजिक, आर्थिक विकासाला हातभार लावू शकेल.

१०) राज्यात रेशीम उत्पादनाला चांगली चालना मिळू शकते.

**पर्यटन**

पर्यटन हा जगभर वाढत चाललेला व मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती करणारा उद्योग आहे. मिझोराम

हे आर्थिकदृष्ट्या संपन्न राज्य होण्यासाठी पर्यटन क्षेत्रात लवकरात लवकर गुंतवणूक करणे आवश्यक आहे. मिझोरामला लाभलेले निसर्ग सौंदर्य आणि सांस्कृतिक वारशाचा ठेवा ही या राज्याची बलस्थाने आहेत. राज्याचे काही बुध्दीमान/हुशार व्यक्तींनी कला व साहित्याच्या क्षेत्रात त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रसिध्द आहेत. मिझोराममधील संगीत, वन्यजीवन, पर्वतारोहन, ट्रेकिंग, साहसी खेळ, धार्मिक स्थाने हे सर्व जगासमोर येणे आवश्यक आहे.

१९८७ मध्ये मिझोरामच्या पर्यटन खात्यासाठी वेगळ्या संचालकांची नियुक्ती करण्यात आली. पर्यटन व्यवसायाच्या विकासाचा भाग म्हणून मोठ्या प्रमाणावर महामार्गावरील हॉटेल्स, पर्यटन स्थळे, लॉज यांचा विकास / निर्मिती करण्यात आली. तरीही पर्यटनाच्या विकासासाठी योग्य ती संपर्क साधने निर्माण होणे आवश्यकच आहे. सध्या राज्यामध्ये केवळ एकच विमानतळ असून ते राजधानी ऐझॉल पासून ३५ कि. मी. अंतरावर आहे. राज्याच्या पर्यटन उद्योगाला अधिक चालना देण्यासाठी पुढील पावले उचलावी लागतील.

१) लुंगलेई येथे विमानतळ बांधणे.

२) राज्याच्या अतिदुर्गम भागात जाण्यासाठी हेलिकॉप्टरची सोय करणे.

३) पालक दिल, नीळ्या टेकड्या (Blue mountain), चापुई (सापी) आणि लाकी मार्गे जाणारा जुना व्यापारी मार्ग चांगला विकसित करुन तेथे आंतरराष्ट्रीय अतिथीगृह निर्माण करणे गरजेचे आहे. कारण, तेथूनच म्यानमार आणि दक्षिण पूर्व आशियात जाता येते.

४) चांगल्या पायाभूत सोयीसुविधांची निर्मिती करणे.

५) मिझोरामच्या संस्कृतीचे मिझोरामच्या बाहेर विपणन (Marketing) करणे.

६) पर्यटनाला चालना देण्यासाठी आर्थिक तरतूद वाढवणे.

**पायाभूत सोयीसुविधा**

दिवसेंदिवस मिझोरामची अर्थव्यवस्था विस्तारत असून त्यासाठी पूरक अशा आवश्यक पायाभूत सोयीसुविधांची गरज आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी तयार केलेली ही एक संरचना आहे. जर ती योग्य पध्दतीने तयार केली नसेल तर अर्थ व्यवस्थेला ती हानीकारक ठरू शकते.

**वीज**

उत्पादक कामासाठी मिझोराममध्ये वीज कमी प्रमाणात उपलब्ध आहे. मिझोरामच्या डोंगराळ प्रदेशात मोठ्या प्रमाणावर नद्या आणि झरे आहेत. त्यांचा उपयोग हायड्रो प्रोजेक्टस्च्या निर्मितीसाठी होवू शकतो. मिझोराममधील जवळपास ८०% गावांचे विद्युतीकरण झाले आहे. राज्यातील उत्पादन आणि वीजेचा अपुरा पुरवठा या गोष्टी लक्षात घेऊन पुढील पावले उचलावी लागतील.

१) महत्त्वाच्या पायाभूत सोयी-सुविधा बळकट करण्यासाठी अधिक निधीची तरतूद करणे.

२) हायड्रो प्रोजेक्टसच्या क्षेत्रातील जे कोणी तज्ञ व्यक्ती किंवा संस्था असतील त्यांना या क्षेत्रात संशोधन करण्यासाठी प्रोत्साहन देणे.

३) वीजेचा वापर औद्योगिकरणासाठी केला तर त्यातून राज्याला महसूल मिळण्यास मदत होईल.

४) वीजेचा होणारा अपव्यय विशेषत: दक्षिण मिझोराममध्ये तो अपव्यय थांबवावा.

**दळणवळण**

देशाच्या इतर कुठल्याही भागापेक्षा मिझोरामला रस्त्यांची सर्वाधिक गरज आहे. राज्यांतर्गत व राज्याबाहेर

प्रवासी आणि मालवाहतुकीसाठी मिझोराम मुख्यत: रस्त्यांच्या जाळ्यांवर अवलंबून आहे. ग्रामीण भागातील लोकांची आर्थिक स्थिती व जीवनमानाचा दर्जा उंचावण्यासाठी राज्यातील सर्व खेडी बारामाही रस्त्यांनी जोडणे आवश्यक आहे. यासाठी रस्त्यांच्या निर्मिती आणि विकासाला सर्वोच्च प्राधान्य देणे गरजेचे आहे. मिझोराममध्ये राष्ट्रीय महामार्ग ५४ हा एकमेव महामार्ग आहे. राज्यामध्ये रस्ते बांधणीच्या कामात सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD), सीमा रस्ता संघटना (BRO-Border Road orgnaistia) आणि NEC, हे प्रमुख घटक/संस्था आहेत. यामध्ये खाजगी कंपन्यांचा तसेच परदेशी कंपन्यांचा समावेश करुन रस्ते बांधणीच्या कामाला चालना देणे गरजेचे आहे.

**अंतर्गत जलवाहतूक**

राज्यामध्ये बऱ्याच नद्या आहेत ज्यांचा उपयोग अंतर्गत जलवाहतुकीसाठी होऊ शकतो. ग्रामीण भागातील लोक या साधनांचा यापूर्वीपासूनच वापर करत आले आहेत. या भागातील अशा साधनांचे व्यवस्थित नियोजन करुन त्यांचा उपयोग मालवाहतुकीसाठी तसेच दूरच्या भागात राहणाऱ्या प्रवाशांच्या सोयीसाठी करणे आवश्यक आहे.

**बंदरांची व्यवस्था**

बांग्लादेश व म्यानमार या दोन देशांच्या सीमारेषांवर असलेले मिझोराम हे एक महत्त्वाचे राज्य आहे. या दोन्ही देशांमध्ये चांगले विकसित असे बंदर आहे. या दोन्ही देशांसोबत जलवाहतुकीचे आणि रस्त्यांचे जाळे विकसित करुन चांगले संबंध निर्माण केले तर त्याचा उपयोग मिझोरामसह संपूर्ण ईशान्येकडील राज्यांना होईल. या दोन्ही देशातील बंदरांच्या माध्यमातून मिझोराम हे आंतरराष्ट्रीय व्यापारी मार्गावरील एक महत्त्वाचे ठिकाण होऊ शकेल. जागतिक बँकेच्या साह्याने तुर्दभूमनहार आणि पार्वा मार्गे अंतर्गत जलवाहतूक आणि रस्त्यांच्या विकासाला चालना देणे आवश्यक आहे. याच पध्दतीने खेंगकाँग मार्गे रस्त्यांचा विकास करता येणे शक्य आहे.

**रेल्वे**

मिझोराम हे भारताच्या मुख्य भूमीशी रेल्वेने थेटपणे जोडलेले नाही. कोकण रेल्वे आणि जम्मू-काश्मीर मधील रेल्वेच्या विकासाचे मॉडेल समोर ठेवून मिझोराममधील रेल्वे वाहतुकीचा विकास करणे आवश्यक आहे. पश्चिम सीमेवरील मंडाले व यांगून सोबत तसेच, पूर्व सीमेवरील रंगमतीशी हा भाग रेल्वेने जोडल्यास त्याचा लाभ राज्यातील सर्वच क्षेत्रांमध्ये व प्रदेशामध्ये दिसून येईल.

**सिंचन**

पावसाळ्यामध्ये मिझोराममध्ये मोठ्या प्रमाणावर पाऊस पडतो. पण, अनिश्चित अशा हवामानामुळे कृषीक्षेत्राला मोठे नुकसान सहन करावे लागते. त्यामुळे राज्यात सिंचनाच्या सुविधा निर्माण करणे आवश्यक ठरते. मिझोराममधील मातीची धारण क्षमता कमी असून खरीप हंगामात देखील या प्रदेशातील पिकांना कमी आर्द्रतेचा सामना करावा लागतो. रब्बी हंगामात मिझोराममध्ये शेती करणे जवळपास अशक्य आहे. रस्त्यांचा विकास आणि वीजेचा पुरवठा यासारख्या सिंचनाशी संबंधित पायाभूत सुविधांच्या माध्यमातून सिंचन क्षेत्राचा विकास / सुधारणा करता येईल.

**मनुष्यबळ विकास**

देशाकरीता काम करण्यासाठी सगळ्या लोकांच्या क्षमतेसह मनुष्यबळ संघटीत करणे आवश्यक आहे. साक्षरतेचा दर आणि शैक्षणिक निकष हे लोकांची गुणवत्ता निश्चित करण्यासाठी महत्त्वाचे असे घटक आहेत, जे लोकांच्या सर्वसामान्य आरोग्यापेक्षा वेगळे आहेत. आर्थिक विकासासाठी लोकांना शिक्षण आणि

प्रशिक्षण देणे ही एक दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे. मनुष्यबळाचा अंदाज, मनुष्यबळाचे शिक्षण आणि प्रशिक्षण आणि मनुष्यबळाचा उपयोग या तीन घटकांमध्ये मनुष्यबळ व्यवस्थापन विभागले आहे. सध्या या तीन घटकांवर राज्याचे काम चालू आहे.

मिझोराममधील मनुष्यबळाचा अभ्यास केला असता असे लक्षात येते की राज्याच्या लोकसंख्येमध्ये तीव्रतेने वाढ होत असून शहरी भागातील लोकसंख्येची घनता देखील वाढत आहे. मिझोराम मधील साक्षरतेच्या उच्च दराचा अर्थ असा होत नाही की हे राज्य प्रशिक्षित, तांत्रिकदृष्ट्या योग्य आणि प्रशिक्षित कर्मचाऱ्यांसह समृध्द/सक्षम आहे. माध्यमिक आणि त्यापेक्षा वरील शैक्षणिक स्तरांवर गणित आणि विज्ञानाच्या चांगल्या शिक्षकांची अजूनही उणीव जाणवते आहे. पण, त्याचवेळी वाढत जाणारी सुशिक्षित बेरोजगारांची संख्या धोक्याचा इशारा देखील देत आहे.

वरील सर्व संदर्भ लक्षात घेता मिझोरामच्या दुर्गम भागातील मनुष्य बळाच्या विकासासाठी केवळ मोठ्या प्रकल्पांमधील गुंतवणुकीची आवश्यकता आहे असे नसून, काही ठराविक क्षेत्रांचा विकास – ज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाची आवश्यकता आहे. अशा क्षेत्रात रोजगार उपलब्ध करणे आवश्यक आहे. याबाबतच्या काही शिफारशी पुढील प्रमाणे आहेत.

१) राज्यपातळीवर मनुष्यबळ विकाससंबंधी एक वेगळा विभाग स्थापन करावा. या विभागाने राष्ट्रीय पातळीवरील तसेच इतर राज्यांच्या मनुष्य बळ विकास विभागाशी समन्वय साधावा.

२) राज्यपातळीवरील सर्व खात्यांकडे मनुष्यबळ विकाससंबंधीचे युनिट असावे.

३) महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण देणाऱ्या संस्था मोठ्या प्रमाणावर उघडणे आवश्यक आहे.

४) रोजगार विनिमय केंद्रांचे आधुनिकीकरण आणि विस्तार करावा.

५) समाजातील दुर्बल घटकांना व अपंगांना करीयर विषयी मार्गदर्शन देणाऱ्या सेवा सुरु कराव्यात.

६) इलेक्ट्रॉनिक्स, टेलिकॉम, अभियांत्रिकी, संगणकशास्त्र यांसारख्या व्यावसायिक क्षेत्रांमध्ये शिक्षण आणि प्रशिक्षणाच्या सुविधा वाढवणे गरजेचे आहे.

**आरोग्य विषयक काळजी**

देशाच्या आरोग्यविषयक नकाशावर ईशान्येकडील राज्ये मलेरिया, एड्स, गॅस्ट्रो या रोगांसाठी ओळखली जातात. या रोगांसाठी हे राज्य मुळीच अपवाद नाही; पण त्याचबरोबर मूत्राशय, गर्भाशय, पोटाचा कॅन्सर यासारखे रोग देखील आहेत. मिझोराममध्ये आरोग्याच्या सर्वसामान्य सुविधा या तशा कमी आहेत. त्यात भर पडली आहे ती अपुऱ्या दळणवळण साधनांची. सध्याच्या आरोग्य विषयक सुविधांना आवश्यक तो आधार राज्यामध्ये तैनात केलेल्या सैन्यदलाकडून दिला जातो. आसाम रायफल्स आरोग्य शिबिरांचे आयोजन करुन त्या त्या भागातील लोकांचे आरोग्य सुरक्षित राखण्याचा प्रयत्न करत आहे. राज्यातील आरोग्याची स्थिती लवकरात लवकर सुधारणे आवश्यक आहे. सुरुवातीला लोकांच्या सर्वसामान्य आरोग्याबाबत जनजागृती आणि दुर्गम भागातील खेड्यांसाठी वैद्यकिय सहायता सुध्दा करुन देणे आवश्यक आहे.

**संपर्काच्या सुविधा**

लवांगटलाई आणि साहिया या दोन जिल्ह्यातील दुर्गम प्रदेश तसेच या दोन जिल्ह्यांच्या जिल्हा परिषदा दूरध्वनीने जोडणे आवश्यक आहे. बी.एस.एन.एल. ची मोबाईल/दूरध्वनी सुविधा देखील या दूरच्या भागात पोहोचत नाही. ऐझॉल, लुंगलेई आणि आसपासच्या

शहरी भागात जे विकासाचे प्रकल्प, योजना उपलब्ध आहेत ते अपुऱ्या संपर्क साधनांमुळे दुर्गम भागात पोहोचत नाही. त्यामुळे हा भाग विकास प्रक्रियेपासून बाजूला राहतो. संपर्क साधनांच्या चांगल्या सोई-सुविधेसाठी लोकांमध्ये याविषयी जनजागृती निर्माण करणे आवश्यक आहे.

**प्रसारमाध्यमये**

दक्षिण मिझोराम मधील खेडेगावांमध्ये सरासरी एक ते दोन टी. व्ही. चे सेटस् आहेत. सामान्यत: हे टी. व्ही. चे सेट अँटेनावर चालतात. या अँटेनाद्वारे म्यानमार मधील प्रक्षेपण लहरी ग्रहण केल्या जातात. तसेच, राष्ट्रीय पातळीवरील काही वाहिन्या देखील दिसतात. ज्यावरील बरेचसे कार्यक्रम हे हिंदी किंवा इंग्रजीमध्ये असतात. या प्रदेशातील लोकांमध्ये मिझो लोकांचे व त्याखालोखाल ब्राह्मी भाषा बोलणाऱ्यांची संख्या अधिक आहे. विकास विषयक कार्यक्रम येथील लोकभाषेत म्हणजे मिझो भाषेत प्रसारित करणे आवश्यक आहे. या दुर्गम भागात अद्याप देखील केबल आणि डी. टी. एच. सारख्या सुविधा पोहोचलेल्या नाहीत. त्यामुळे या भागातील विकासाची जबाबदारी अर्थातच शासनावर येऊन पडते. या दुर्गम भागापर्यंत प्रसारमाध्यमे पोहोचली तर मुख्यप्रवाहातील वैज्ञानिक, तांत्रिक, आर्थिक विकासाच्या घडामोडींशी येथील लोकांचा जवळून परिचय होईल.

**निष्कर्ष**

राज्याचा सर्वांगिण विकास करण्यासाठी आणि विकासाचा असमतोल दूर करण्यासाठी राज्यातील उपलब्ध मनुष्यबळाचा उपयोग औद्योगिकरण आणि प्रशासकीय घडी व्यवस्थित बसवून घेण्यासाठी करणे आवश्यक आहे. जेणेकरुन विकास कार्यक्रमांना चालना मिळेल. नवीन योजना तयार करताना सुशिक्षित युवकांमध्ये वाढणारी बेरोजगारी गरीब - श्रीमंत, शहरी - ग्रामीण या घटकांमध्ये परस्पर वाढत जाणारी दरी यांचाही विचार करणे आवश्यक आहे.

ग्रामीण भागातील औद्योगिकरण, शेतीच्या सुधारित पध्दती विकसित करणे आणि उत्पादकता वाढवणे - या मार्गानेच विकासाची फळे सर्वांना चाखता येतील. याशिवाय वेगाने वाढणारी लोकसंख्या आणि त्यामुळे जमिनीवर पडणारा ताण या गोष्टी देखील तपासून बघणे आवश्यक आहे. शिक्षण, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य, परिवहन, वीज यांसारख्या क्षेत्रातून वाढत्या मनुष्यबळाला शासन रोजगार पुरवू शकते. सुयोग्य व्यवस्थापन, समन्वय आणि पूर्ण विचारांती प्राधान्यक्रम ठरविल्यास या राज्याचे प्रगतीशील राज्यामध्ये रुपांतर करणे येथील जनतेला सहज शक्य होईल.

*(मराठी अनुवाद : डॉ. शैलेश दळवी)*

• • •

# माझा मिझोरामकडे प्रवास

**सोनाली मुटाटकर**

लष्करी जीवनामध्ये आपल्याला देशविदेशातील अनेक अप्रतिम ठिकाणांचा प्रवास करण्याची व अनुभव घेण्याची संधी मिळते. लष्करी अधिकाऱ्यांची नात, मुलगी आणि आता पत्नी झाल्याने मी खूप भाग्यवान आहे की मला आपल्या महान देशातील कानाकोपऱ्यात प्रवास करण्याची संधी मिळाली. यामुळे माझा आत्मविश्वास वाढण्याबरोबरच माझे मित्र, जे नेहमीचे सांसारिक आनंदी जीवन जगत आहेत त्यांपेक्षा जास्ती वेगळा आनंद प्राप्त झाला. अशाच एका नियुक्ती दरम्यान आम्हाला अपरिचित अशा उत्तर पूर्व भारतातील नागालँड प्रदेश आसाम रायफल्समध्ये जाण्याची संधी मिळाली. अनोळखी प्रदेश असल्यामुळे मनामध्ये धास्ती आणि चिंतेचा कल्लोळ निर्माण झाला होता. (हा विचार फारच चुकीचा असल्याचे कालांतराने अनुभवास आले.)

माझे उत्तर पूर्वेकडील वास्तव्य मला फार धुसर-पणे आठवते आहे. मी त्यावेळी म्हणजे ८० च्या दशकात शाळेत जात असे. मला एवढेच आठवते आहे की स्थानिक उठावामुळे शाळा आठवड्यातून २-३ दिवस बंद असायची. त्यामुळे आमचा बहुतेक कालावधी आईबरोबर घरामध्येच जात असे व त्यावेळी शेकोटीच्या उबदार वातावरणात आई मला गणिताचे प्राथमिक धडे देत असे. ह्या स्मृती जाग्या झाल्यावर आम्ही जाणीव-पूर्वक मुलांना अशा भयाण ठिकाणी घेऊन जाण्यापेक्षा आहे त्या ठिकाणी राहण्याचा निर्णय घेतला. परंतु ज्यावेळी जीवनात स्थित्यंतर घडणार हे लक्षात आल्यावर हा निर्णय बदलावा लागला.

एक दिवस पुण्यामध्ये असताना माझ्या पतींचा मला निरोप आला की, त्यांची बदली मिझोराममध्ये झाली असून राहण्याची व्यवस्था झाली असल्याने येत्या उन्हाळ्याच्या सुट्टीत आम्हाला तिकडे येण्यास काही हरकत नाही. थोडक्यात आम्ही मे मधील रखरखीत उन्हाच्या दिवशी कलकत्त्याहून ऐझॉलला जाणाऱ्या विमानात बसलो. माझ्या मुलीने प्रश्न विचारला की इथल्या सर्व बायका लुंगी का घालतात आणि सर्वच लोक पान का खातात ?

मला मिझोराममध्ये आल्याची जाणीव झाली. खिडकीतून बाहेर बघितल्यावर आमचे विमान हळूवारपणे नयनरम्य 'लेंगपुई' विमानतळावर उतरताना दिसत होते, जे राजधानी आयझॉलपासून दोन तास प्रवासाच्या अंतरावर आहे.

ऐझॉल हे मिझोरामचे व्यस्त महानगर व राजधानी असून नमुदेदार डोंगराळ शहर आहे, ज्याची ७०% लोकसंख्या मिझो लोकांची आहे. कारण इतर क्षेत्रांच्या तुलनेत इथे सोयी-सुविधा चांगल्या आहेत. ऐझॉल हे वेगाने वाढणारे शहर असून अनाकलनीय अशा डोंगर उतारावर वसलेले आहे. त्यामुळे घरे तिरक्या पध्दतीने बांधलेली आहेत. शहरा लगतची घरे बांबूच्या मचाणीवर बांधलेली असून बांबू व लाकडापासून तयार केलेली आहेत. शहरातील घरे सिमेंटची असून तीपण सिमेंटच्या मचाणी सारख्या व्यवस्थेवर बांधलेली आहेत. वाटेत माझे पती मला या जागेत राहण्याच्या पध्दतीविषयी सतत सूचना करत होते. आम्ही ऐझॉल मध्ये पोहोचलो. ऐझॉलची 'चर्चचे शहर' म्हणून सहजपणे ओळख सांगता येईल. कारण प्रत्येक वसाहत रस्ता; इतकेच नव्हे तर गल्ली बोळांचे सुद्धा स्वत:चे चर्च आहे. ह्यामध्ये सर्व ख्रिश्चन समुदायांची प्रेस्बीटेरीयन, बाप्टीस्ट, अ‍ॅडव्हेन्टीस्ट व इव्हानजेलीकल चर्चचा समावेश आहे. वास्तुकला प्रामुख्याने व्हिक्टोरीयन आहे. रविवारी सामुदायिक

प्रार्थनेच्या वेळी सर्व स्त्रिया अत्याधुनिक पाश्चिमात्य पोशाखात व सर्व पुरुष त्यांच्या सर्वोत्कृष्ट इंग्रजी पोशाखात रस्त्यावरुन प्रार्थनेसाठी जातात. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी मागे ठेवलेला विशिष्ट वारसा रविवारीच नाही, तर प्रमुख ख्रिस्ती सणांच्या वेळी सुध्दा बघायला मिळतो. मिझोरामसारख्या मागास आदिवासी राज्याच्या दृष्टीने आमच्या अपेक्षेपेक्षा ऐझॉल फारच आधुनिक शहर आहे.

दुसऱ्या दिवशी आम्ही अजून दक्षिणेकडे असलेल्या मिझोरामच्या दक्षिण प्रमुख नगर 'लुंगलेई' कडे निघालो. पूर्वी ज्यावेळी मिझोराम आसामचा एक जिल्हा होते, त्यावेळी लुंगलेईकडे ढाक्यापासून जाणे सोयीचे पडत होते. राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४ वरुन जाताना वळणावळणाने आम्हाला दक्षिण मिझोरामच्या दुर्गम भागातील विशिष्ट मांडणीची गावे दिसतात. प्रत्येक गावात गेल्यावर मित्रत्वाच्या नात्याने 'चिबायऱ्ली' अशा शब्दांनी स्वागत केले जाते. सर्व गावे डोंगर माथ्यांवर वसलेली आहेत. ही गावे स्वच्छ असून पध्दतशीर पणे वसाहतींमध्ये (वेंग) विभागलेली आहेत.

ठराविक अंतरावर प्रत्येक घरासमोर कचराकुंडी लाल व काळ्या पटट्यांनी रंगवून घरासमोर घराचा क्रमांक व वस्तीचे नाव घालून ठेवलेली दिसते. ज्या-वेळी तुम्ही 'दाम माकीन । मांगथाली ।' असे फलक बघता, त्यावेळी गावाचा निरोप घेत असल्याचे लक्षात येते. वर्ग आणि लिंगभेद रहीत मिझो लोक समतावादी असून त्यांच्या 'त्लां गाठिना' परंपरेचे पालन करतात, ज्या मध्ये आदरातिथ्य असणाऱ्या जीवनपध्दतीचे मार्गदर्शन केले आहे. 'यंग मिझो असोसिएशन' ह्या सर्वात जुन्या स्वयंसेवी संस्थेच्या कार्यामुळे मिझोलोक स्वयंशिस्तीचे आहेत. ही संस्था इंग्लंडच्या 'यंग वेल्थ असोसिएशन' ह्या संस्थेच्या धर्तीवर आधारित आहे. ह्या स्वयंसेवी संस्थेचे सभासद संपूर्ण मिझोराम मधील सर्व वयोगटातील स्त्री, पुरुष आहेत. गावातून फिरताना ह्या संस्थेचे महत्त्व पदाधिकाऱ्यांच्या घरावरील फलक बघूनच लक्षात येते. मिझो लोक खेळ प्रेमी असून प्रत्येक वस्तीवर बॅडमिंटन कोर्ट असून मित्रत्वपूर्ण लढती होताना दिसतात. दहा लाखाच्या लोकसंख्येचे राज्य असून राष्ट्रीय स्तरावर बॉक्सींग, फुटबॉल, नेमबाजी ह्या खेळात खेळाडूंनी प्रतिनिधित्व केले आहे.

मिझोबाबत बघताक्षणी लक्षात येणारी दुसरी गोष्ट म्हणजे स्थूल मिझो लोक क्वचित बघायला मिळतात. काही स्थूल लोक आहेत ते ऐझॉल मध्ये आढळतील. ते केवळ आरोग्य व तंदुरुस्तीबद्दलच जागरुक नाहीत तर आहाराच्या चांगल्या सवयींमुळे देखील त्यांचा बांधा सडपातळ राहा तो. मिझो लोक दिवसात केवळ दोन वेळाच जेवतात. सकाळी ९ वाजता व सायंकाळी ५ वाजता. जेवणामध्ये जास्तीकरुन भात, भाजी आणि डुकराचे मांस असते. मीठ, मिरची आणि मिरे हे सुध्दा वेगळे ठेवले जाते, जेणेकरुन चवीनुसार आणि गरजेनुसार घेता येईल. ह्यामुळे वजन वाढण्याची कोणतीच शक्यता शिल्लक राहात नाही. यातच भर म्हणून नियमित बॅडमिंटन खेळण्याने त्यांची तब्येत सडपातळ राहाते. मिझोराम मध्ये संपूर्ण दारुबंदी आहे, आणि त्यात युवा मिझो संघटना आणि चर्च मिळून दारूबंदीचा कार्यक्रम कडकडीतपणे पाळतात. वेळ पडल्यास हे सगळे मिळून बेकायदेशीर दारु विकणाऱ्यांवर धाड टाकतात. मिझो गावामध्ये सायंकाळी फेरी मारावयास गेल्यावर मिझो युवक-युवती गाण्यांचा सराव करताना दिसतात. मिझो संगीत अत्यंत मधुर असून आपल्या पसंतीस चटकन उतरते. परिणामी त्यांच्या संगीत मैफिलीत आम्हाला नियमितपणे बोलावत असत. जरी भाषा समजत नसली तरी मिझो संगीत काळजाचा ठोका चुकविणारे असते, त्यामुळे मिझोराममध्ये गेल्यावर एक तरी संगीत मैफील बघावीच.

मिझो हे आनंदी व समाधानी लोक आहेत. त्यांना नृत्य व संगीताविषयी प्रेम असून आनंदी आयुष्य जगतात. मिझो गावामधील लोक फार उपयोगी पडणारे

आहेत. मिझो लोकांनी कष्टाने स्वातंत्र्य मिळवले असून ते नेहमी त्याचा आनंद व्यक्त करतात आणि लालपाचे (देवाचे) आभार मानतात. मिझो लोक जेवणापूर्वी, प्रवासापूर्वी, प्रवासात, दुपारी, सायंकाळी, दिवसाच्या शेवटी प्रार्थना करताना दिसतात. म्हणून मिझो लोकांची नावे 'ला' शब्दानी सुरू होताना दिसतात. उदा. लालेग, लाल रामपुई, लालमाचुन्ना, लालथनवाल, लालथंमपुईचा इत्यादी. मिझो लोक अत्यंत धार्मीक लोक असून हा समाज देवकृपेने पवित्र झालेला आहे. मिझो लोकांनी केलेली विविध नृत्य बघण्यासारखी असतात. मिझोराम मधील सर्वोत्तम काळ हा 'चापचार कुट'. दरम्यान जो मार्च महिन्याच्या दुसऱ्या शुक्रवारी सादर केला जातो. हा सुगीचा काळ असून संपूर्ण राज्यच उत्सवात मग्न असते. ज्यात नाच आणि शुभकामे केली जातात. 'चिराव' बांबू नृत्य हे सर्वात जास्ती केले जाणारे 'चापचार कुट' मधील नृत्य होय. ह्या नृत्याच्या नावासंबंधी अनेक अख्यायिका आहेत, पैकी एक पुढील प्रमाणे- एका ब्रिटीश महिलेने चिराव नावाच्या गावात हे नृत्य पहिल्यांदा पाहिले व परत गेल्यानंतर तिला नृत्याचे नाव आठवेना, म्हणून तिने ह्या नृत्याला चिराव नृत्य असे नाव दिले व तेच प्रचलित झाले.

स्थानिक अख्यायिका वेगळीच आहे. पूर्वीच्या काळात ज्यावेळी बालमृत्यूचा दर जास्ती होता त्यावेळी मातामृत्यू किंवा बालमृत्यू झालेल्याच्या आत्म्याला सद्‍गती लाभण्यासाठी हे नृत्य करत. अशीच कथा रिह तलावाबाबत आहे. सध्या हा तलाव म्यानमारमध्ये मिझो सीमेलगत चाम्पाई जिल्ह्याला आहे. तो सर्वात मोठा मिझो तलाव म्हणून प्रसिध्द आहे. हा तलाव बदामाकृती असून लालपाच्या क्षेत्रात जाण्याचा मार्ग समजला जातो. चाम्पाई जिल्हा हा मिझोरामचे धान्य कोठार समजले जाते, ज्या ठिकाणी सर्व राज्याला पुरेसा तांदूळ पुरवठा होतो.

मिझोरामची कथा मौतम दुष्काळाविषयी सांगितल्याशिवाय पूर्ण होणार नाही. मिझोराममध्ये बांबूची जंगले आहेत. ज्यात विविध प्रजातीचे बांबू उगवतात. पैकी एका जातीच्या बांबूला दर पन्नास वर्षांनी फुलोरा येतो. या काळात उंदीर व घुशींची संख्या वाढते व त्यांचे प्रजनन अनेक पटींने वाढते. हे उंदीर उभ्या पिकांची नासाडी करतात व त्यामुळे दुष्काळास सुरुवात होते. असा दुष्काळ १९५९ साली आला होता. ज्यावेळी पूर्वतयारी आणि शासकीय शिथिलतेमुळे (त्यावेळी मिझोराम आसाम राज्यात होते) मोठ्या प्रमाणावर वित्त व जिवित हानी झाली होती.

मिझो राष्ट्रीय दुष्काळ निवारक दलाची स्थापना पु लालडेंगा (माजी सैनिक) ह्यांनी दुष्काळ निवारण्यासाठी सुरु केली. त्यावेळी ह्या संघटनेच्या नेत्यांनी राजकीय स्वरूप धारण करुन वेगळ्या मिझो राज्याची मागणी केली. त्यावेळी ह्या उठावाने वाईट वळण घेतले. १९८६ साली भारत सरकारने मिझो नॅशनल फ्रंट बरोबर शांती समझोता करार केला, तेव्हाच हा उठाव शांत झाला. मिझोराम हे जगातील क्वचित दिसणारे उदाहरण आहे, ज्या ठिकाणी लोकांनी स्वातंत्र्याचे आणि शांततेचे मूल्य जाणले आणि त्यावेळेपासून शाश्वतरित्या पाळत आले आहेत. शांतता आणि विकासाचे फळ स्वरुपात आज मिझोराम राज्य केवळ नंतरचे साक्षरतेचे प्रमाण जास्ती असणारे राज्य झाले आहे.

कोणत्याही उत्साही प्रवाशाने मिझोरामला अवश्य भेट द्यावी. अत्यंत महत्वाची आहे. ऐझॉल मधील बाराबाझार, लुंगले मधील चानमारी, साहिआ मिझोराम मधील नील पर्वत हे पर्यटकांचे स्वर्ग आहेत. खरोखर महान भारतीय लष्कराशिवाय मला हा उत्तर पूर्वेकडचा स्वर्ग बघणे दुरापास्त होते.

*(मराठी अनुवाद :*
*डॉ. शैलेश दळवी, सुशिल कहात)*

• • •

# उत्तर पूर्व भारतातील ग्रामीण विकास कार्यक्रम

भारताच्या उत्तर पूर्व विभागामध्ये अरुणाचल प्रदेश, आसाम, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड, सिक्किम व त्रिपुरा या राज्यांचा समावेश होतो. ही राज्ये देशाच्या एकूण भूभागापैकी ८% भूभाग व देशाच्या लोकसंख्येपैकी ४% लोकसंख्या व्यापतात. ह्या प्रदेशालगत भुतान, चीन, तिबेट, म्यानमार व बांगलादेश या देशांची ४५०० कि. मी. लांबीची आंतरराष्ट्रीय सीमा आहे. बहुतांश प्रदेश दुर्गम व डोंगराळ आहे. या भागात लोकसंख्येची घनता १२२ प्रती. चौ. किमी इतकी तर साक्षरता दर (२००१ च्या जनगणनेनुसार) राज्य निहाय वेगवेगळा आहे. अरुणाचल प्रदेशात ५४.१५% तर मिझोराममध्ये ८८.४१% इतका आहे. ग्रामीण भागातील साक्षरता दर अरुणाचल प्रदेशात ३७.०२% तर मिझोराममध्ये ७२.४७% इतका आहे.

योजना आयोगाकडून प्रा. डी. टी. लाकडावाला यांच्या अध्यक्षतेखालील योजना आयोगाच्या तज्ज्ञ समितीच्या अहवालानुसार उत्तर पूर्व भागात १९९३-९४ मध्ये गरिबीचे प्रमाण ग्रामीण लोकसंख्येच्या ४५.०१ टक्के होते. हा दर वर्ष २००० च्या राष्ट्रीय प्रतिदर्श सर्वेक्षणाच्या ५५ व्या अहवालानुसार ४०.०१% इतका आहे.

राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संघटना (NSSO) च्या ५५ व्या सर्वेक्षणानुसार १३१.५३ लक्ष लोक दारिद्र्य रेषेखाली आहेत. आसाममध्ये दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण सर्वात जास्त (९२.१७ लक्ष), त्रिपुरा (१२.५३ लक्ष) मेघालय (७.७३ लक्ष), मणिपूर (६.५३ लक्ष), नागालँड (५.२१ लक्ष), अरुणाचल प्रदेश (३.८० लक्ष), सिक्किम (२ लक्ष) व मिझोराम (१.४० लक्ष), भारत सरकार या सर्व राज्यांना देशातील इतर राज्यांच्या बरोबरीने आणण्याकरिता पायाभूत सुविधांचा विकास, रोजगार निर्मिती व गरिबी निर्मूलन हे कार्यक्रम ग्रामीण भागात घेण्याबाबत गंभीर आहे. उत्तर-पूर्व भारतातील ग्रामीण विकासावर भर देण्याच्या दृष्टीने, ग्रामविकास मंत्रालयाच्या अनेक योजना या भागात राबवित आहे.

उदा. स्वयंरोजगाराच्या योजना - स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना, रोजगार हमी योजना, संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना, इंदिरा आवास योजना, प्रधानमंत्री ग्रामोदय योजना, ग्रामीण आवास, केंद्रिय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम, त्वरीत ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम, एकात्मिक पडिक जमीन विकास कार्यक्रम, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, ह्या योजनांविषयी संक्षिप्त माहिती पुढील प्रमाणे.

**उत्तरपूर्व राज्यातील पंचायत राज संस्था**

१९९२ साली केलेल्या संविधानामधील ७३ व्या घटनादुरुस्तीतील तरतूदी मेघालय, मिझोराम, नागालँड ह्या राज्यात लागू केलेल्या नाहीत. ही घटना-दुरुस्ती मणिपूर, त्रिपुरा व आसाम राज्यातील सहाव्या उपयोजना क्षेत्राला पण लागू नाहीत. ह्या राज्यांमध्ये कृति संशोधन अभ्यास व पंचायत राज कार्यशाळां-

करिता पस्तीस लक्ष रुपये इतका निधी राखून ठेवण्यात आला होता; परंतु योग्य स्वयंसेवी संस्था आल्या नाहीत म्हणून हा निधी वापरला नाही.

### अरुणाचल पंचायती राज विधेयक

८३ वी घटनादुरुस्ती, २००० ही संसदेकडून सप्टेंबर २००० मध्ये पारित करण्यात आली. ज्यानुसार अरुणाचल प्रदेश सरकारला अनुसूचित जातीकरिता पंचायतीमध्ये आरक्षणापासून सूट देण्यात आली. ८.९.२००० रोजी पारित घटना दुरुस्ती विधेयकास मा. राष्ट्रपतींनी अनुमती दिली व १३.४.२००१ रोजी राष्ट्रपतींनी अरुणाचल पंचायतीराज विधेयक १९९७ ला अनुमती दिली.

### निवडणुका

वर्ष २००१ मध्ये अरुणाचल मधील पंचायत निवडणुका होणार आहेत. अरुणाचल प्रदेश पंचायत राज विधेयक मे २००१ मध्ये अधिसूचित करण्यात आले; परंतु अद्याप निवडणुका घेण्यात आल्या नाहीत. अरुणाचल प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांना पंचायत निवडणुका लवकरात लवकर घेण्याबाबत सूचना केली आहे.

### कार्यभार, वित्त व कार्यप्रणालीचे हस्तांतरण

ज्या अर्थी अरुणाचल प्रदेशमध्ये पंचायत राज नाही, राज्याने अद्याप पंचायतींना अधिकार हस्तांतरणाविषयी कोणताही आदेश दिलेला नाही. आसाम राज्याने पंचायतींकडे कार्यभार हस्तांतरण केले आहेत; परंतु वित्त व कार्यप्रणालीचे हस्तांतरण बाकी आहे. मणिपूरमध्ये २२ विषयांचा कार्यभार हस्तांतरीत केलेला आहे; परंतु येथेही वित्त व कार्यप्रणालीचे हस्तांतरण नाही. हीच अवस्था त्रिपुरा राज्याची आहे, हस्तांतरण या ठिकाणी १२ विषयांचे हस्तांतरण झाले आहे.

### राज्य वित्त आयोग

अरुणाचल प्रदेश व आसाम या राज्यांचा पहिला वित्त आयोग अजून गठित झालेला नाही. मणिपूर, सिक्किम व त्रिपुरा यांनी दुसरा आयोग गठीत केला आहे; ज्याचा अहवाल अपेक्षित आहे.

### स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना

स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना हा कार्यक्रम ग्रामीण गरिबांकरिता एकात्मिक स्वयंरोजगारासाठी असून ०१-०४-१८९९ पासून कार्यान्वित आहे. ही योजना निश्चित उद्देशांनी सुरु केली असून ग्रामीण भागातील कुटुंबांचे आर्थिक उत्पन्न वाढविण्याबरोबरच या कार्यक्रमातून गावपातळीवर चालतील अशा स्थानिक गरजा व संसाधनावर आधारीत कार्यक्रमांचा आराखडा तयार होतो आहे. या योजने अंतर्गत स्वयंरोजगारी कुटुंबांना दारिद्र्यरेषेवर आणण्याकरिता बँकांकडून मदत व शासनाकडून अर्थसहाय्य नियोजन आहे. या योजनेचा मुख्य भर ग्रामीण गरिबांच्या कौशल्य आधारित लघुउद्योग व त्याद्वारे शाश्वत आर्थिक उत्पन्न कार्यक्रम करणे हा आहे. हे करताना विविध घटक जसे क्षमता विकास, कौशल्य विकास, पत, प्रशिक्षण, तंत्रज्ञान, पणन व पायाभूत सुविधांमध्ये प्रभावी दुवा निर्माण करणे हा आहे. ह्या योजनेअंतर्गत मूलभूत दिशानिर्देशन कार्यक्रम व क्षमता विकासाचे प्रशिक्षण स्वरोजगारी कुटुंबांना देण्यात येईल.

### संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना

रोजगार हमी योजना व जवाहर ग्रामीण स्वरोजगार योजनांच्या विलिनीकरणातून संपूर्ण ग्रामीण

रोजगार योजना, ग्रामीण गरीब जनतेला रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी २५.९.२००१ पासून सुरु करण्यात आली. ह्या योजनेअंतर्गत वाढीव रोजगार मिळवण्याच्या संधी निर्माण केल्या आहेत. ज्या कालावधीत लोकांना काम नसेल, त्या कालावधीत ते उपलब्ध करुन देणे हा प्रमुख उद्देश व त्याबरोबरच टिकाऊ समाज निर्माण करुन त्याद्वारे सामाजिक व आर्थिक असे रोजगार व विकासाचे शाश्वत स्त्रोत निर्माण करणे.

**ग्रामीण घरकुल योजना**

ग्रामीण घरकुल योजना जशा, इंदिरा आवास योजना, प्रधानमंत्री ग्रामीण आवास, दारिद्रय रेषेखालील लोकांना घरकुल योजना या भागात राबविल्या जातात. समग्र आवास योजना व नाविन्यपूर्ण ग्रामीण घरकुल योजना व वस्तीविकास यांच्याद्वारा नविन बांधकाम तंत्रज्ञान, साहित्य व पध्दतींचा वाजवी किंमतीत व पर्यावरण पोषक अशा वस्ती विकासासाठी प्रचार व प्रसाराचे काम ग्रामविकास मंत्रालयाने उत्तर पूर्व भागात हाती घेतले आहे.

**प्रधान मंत्री ग्राम सडक योजना**

खेडेगावाच्या आर्थिक विकासासाठी ग्रामीण रस्ते चांगले असणे अत्यावश्यक आहे, हे लक्षात घेऊन, केंद्र सरकारने १००% अनुदानावर आधारित प्रधानमंत्री ग्राम सडक योजना सुरु केली. ह्या योजने-अंतर्गत रस्ते नसलेल्या १००० लोक वस्तीच्या गावांना २०००-२००३ पर्यंत व ५०० लोकवस्तीच्या गावांना २००७ पर्यंत जोडण्यात येईल. डोंगराळ प्रदेशात व वाळवंटात हे उद्दिष्ट २५० लोकवस्तींचे गाव २००७ पर्यंत रस्त्याने जोडणे आहे. लोकसंख्या मोजताना ज्या वस्त्या ५०० मिटर अंतरात किंवा डोंगराळ प्रदेशात १.५ कि. मी. अंतरावर असतील त्यांचा एकत्रित विचार केला जातो.

**ग्रामीण पाणी पुरवठा योजना**

ग्रामीण भागात शुद्ध व सुरक्षित पेयजल पुरवठा करण्याचे बंधन ग्राम विकास मंत्रालयावर आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्याकरिता तातडीने ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम आणि प्रधानमंत्री ग्रामोदय योजना ग्रामीण पेयजल हे दोन कार्यक्रम उत्तरपूर्व राज्यातील ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्याकरता सुरु केले आहेत. या कार्यक्रमात पावसाच्या पाण्याचे पुनर्भरण व शाश्वत पेयजल स्त्रोत विकासाचा अंतर्भाव आहे.

**ग्राम स्वच्छता योजना**

ग्राम स्वच्छतेची व्याप्ती वाढवण्यासाठी, केंद्राचा केंद्रीय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम उत्तर-पूर्व राज्यात प्रकल्प पध्दतीने राबवीला जात आहे. हा कार्यक्रम समाजभिमुख व लोककेंद्रीत आहे. राज्याकडून निवडक तालुक्यांकरता केंद्राचे अनुदान मिळण्याकरता प्रकल्प तयार केले जात आहेत.

**हरियाली**

पडिक जमिनीची उत्पादन क्षमता वाढविणे व ग्रामीण भागातील गरिबांचे जीवनमान सुधारण्यासाठी भारत सरकारने 'हरियाली' ही नविन योजना निर्माण केली आहे. ह्याचे ध्येय पंचायत राज संस्थांचा जलसंधारण विकास कामात उदा. एकात्मिक जलसंधारण कार्यक्रमा सहभाग वाढवणे व बळकट करणे हे आहे. ह्या कार्यक्रमांतर्गत ग्रामपंचायत, पंचायत

समिती/जिल्हासमितीच्या मदतीने जलसंधारण कार्यक्रम घेऊ शकते. या करता पंचायत समिती /जिल्हासमिती तांत्रिक सहाय्य करते. ह्या दोन्ही संस्थांकडे तांत्रिक कर्मचारी नसल्यास शासकीय किंवा स्वायत्त संस्थेकडून तांत्रिक सहाय्य उपलब्ध करुन घेऊ शकतात. कोणताच पर्याय उपलब्ध नसल्यास नामांकित स्वयंसेवी संस्थांची मदत घेता येईल.

**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (D.R.D.A.)**

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रमुख ध्येय हे या यंत्रणेद्वारे ग्राम विकास मंत्रालयाने गरिबी निर्मूलनाचे कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्याच्या संदर्भात क्षमता वाढविणे व इतर संस्थांबरोबर समन्वय ठेवणे आहे. या यंत्रणेने पंचायत राज संस्थांबरोबर प्रभावी समन्वय साधणे अपेक्षित आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष हे ह्या यंत्रणेचे अध्यक्ष असले तरी यंत्रणेचे मार्गदर्शक तत्वानुसार वेगळे अस्तित्व राखणे अपेक्षित आहे.

**गरिबी निर्मूलनासाठी विशेष उपक्रम**

- उत्तर-पूर्व विभागातील ग्रामविकास कार्यक्रमांचा आढावा, समन्वय व संनियंत्रण करण्याकरिता सहसचिव, ग्रामीण विकास मंत्रालय यांच्या नियंत्रणाखाली उत्तरपूर्व कक्ष निर्माण केला आहे.
- उत्तरपूर्व विभागातील राज्यांचा विकास सर्वात जास्ती विकसित राज्यांबरोबर व्हावा व हा विकास होताना तो पायाभूत सुविधा, रोजगार निर्मिती, गरीबी निर्मूलना द्वारे होऊन शाश्वत स्वरुपाचा असावा म्हणून भारत सरकारने सर्व केंद्रिय मंत्र्यांना त्यांच्या अंदाजपत्रकातील १०% निधी उत्तर पूर्व राज्यांच्या विकासाकरता वर्ष २०००-२००१ पासून वाटप करणे सुरु केले आहे. हा निधी त्या आर्थिक वर्षात वापरला गेला नाही, तर हा निधी अन्य कामांकरिता किंवा राज्यांकरिता न वळवता, पुढील विकास कामांकरिता संचित करुन ठेवला जातो.
- सर्व उत्तर पूर्व राज्यांना त्यांच्या प्राथमिकतेनुसार ग्राम विकासाच्या विविध अंगांचा विचार करुन, ग्रामविकासाकरिता एकात्मिक विकासाचा धोरणात्मक आराखडा ज्याद्वारे सर्व तरतूद वापरात येऊ शकेल, बनविण्यास सूचित केले आहे.
- निधीचा उपयोगीता स्तर सुधारत असून वर्ष २००१-२००२ मध्ये केवळ २९.६४ कोटी रुपये अव्यपगत (non-lapsable) निधीकडे गेले तर वर्ष २०००-२००१ मध्ये ३२४ कोटी रुपये या निधी साठ्याकडे वळवण्यात आले.
- ग्रामविकास कार्यक्रमांकरिता उपलब्ध निधी विनियोगामध्ये येणाऱ्या अडचणी सोडवणे व त्यावर आधारीत नविन मार्गदर्शक तत्वे निर्माण करण्याच्या हेतुने अतिरिक्त अर्थ सल्लागारांच्या अध्यक्षतेखाली एक अंतर मंत्रालयीन समिती स्थापित करण्यात आली आहे. ह्या समितीने ११ सप्टेंबर २००१ रोजी अहवाल सादर केला.
- वरील समितीच्या शिफारशीनुसार, कार्यक्रम चालविण्याच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये योग्य बदल करण्यात आले.
- उत्तरपूर्व विभागातील ग्रामीण विकास मंत्र्यांचे वार्षिक संमेलन नियमितपणे घेण्यात येते. २८ ऑक्टोबर २००२ रोजी अशाप्रकारचे पाचवे संमेलन भरवण्यात आले, ज्या मध्ये ग्रामविकास

मंत्री, सचिव, सहसचिव व अतिरिक्त सचिव उपस्थित होते. ह्या संमेलनात विविध केंद्र पुरस्कृत योजनांचा आढावा घेऊन त्यांची योग्य अंमल बजावणी होण्याच्या दृष्टीने त्यामधील त्रुटी दूर करण्यात आल्या.

- १ एप्रिल १९९९ पासून उत्तर पूर्व राज्यांमध्ये संपूर्ण ग्रामीण स्वरोजगार योजने अंतर्गत १८ विशेष कार्यक्रम मंजूर करण्यात आले आहेत. १८ कार्यक्रमांपैकी ७ आसाममध्ये, २ प्रत्येकी अरुणाचल प्रदेश, मणिपूर व त्रिपूरामध्ये. ४ मिझोराममध्ये व १ नागालँडमध्ये. सर्व कार्यक्रमांसाठी ग्रामविकास मंत्रालयाची तरतूद ६३.११ कोटी रुपये आहे. पैकी २७.२८ कोटी आतापर्यंत देण्यात आले.

- राष्ट्रीय ग्रामीण विकास संस्था, उत्तर पूर्व विभागीय केंद्र गुवाहाटी द्वारा उत्तर-पूर्व राज्यातील रोजगार संधींचा शोध घेतला जाईल असा संशोधन आभ्यास हाती घेण्यात आला आहे.

- ग्रामीण आवास योजने अंतर्गत २९ अभिनव गृह निर्माण प्रकल्पांना उत्तर पूर्व राज्यांमधे वर्ष २०००-२००१ पासून आजपर्यंन्त मंजुरी देण्यात आली आहे. २९ पैकी १२ अरुणाचल प्रदेशात, २ आसाम, ५ प्रत्येकी मणिपूर, मेघालय, व नागालँड मध्ये आहेत. या प्रकल्पांसाठी संपूर्ण तरतूद १२.६४ कोटी रुपये आहे. पैकी ७.७२ कोटी रुपये आतापर्यंत देण्यात आले.

- ग्रामविकास मंत्रालयाच्या कार्यक्रमांचे संनियंत्रण व कार्यक्रम राबविताना दक्षता घेण्यासाठी जिल्हास्तरीय नियंत्रण पध्दती अवलंबली आहे, ज्या मध्ये माजी सैनिक, निवृत्त शासकिय अधिकारी व निवृत्त निम-सैनिकी कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला आहे.

**ऑक्टोबर २००२ पर्यंतचा कार्यक्रमांचा आढावा**

चालू आर्थिक वर्षात (नोव्हेंबर २००२ पर्यंत) एकूण १६८८.९६ कोटी तरतूदीपैकी राज्यांकडून ७२८.१७ कोटी रुपयांची मागणी करण्यात आली. (ह्यामध्ये संपूर्ण ग्रामीण रोजगार योजने खाली असलेल्या धान्याचा पण समावेश आहे.) संपूर्ण उपलब्ध निधी ११०३.०९ कोटी रुपयांपैकी २८०.९९ कोटी इतकाच निधी खर्ची पडला, जो संपूर्ण निधीच्या ३२% इतकाच आहे. अरुणाचल प्रदेश व नागालँड राज्यांनी उपलब्ध निधीपैकी ११% निधी खर्च केला आहे. मणिपूर राज्याने १३% निधी खर्च केला. त्रिपुरा ७५% पेक्षा जास्ती निधी तर, आसामने ३५% निधी खर्च केला आहे. ह्या कालावधीत २१० लक्ष मनुष्य दिवस इतके काम रोजगार हमी योजने अंतर्गत निर्माण करण्यात आले. सं. ग्रा. रो. यो. अंतर्गत उपलब्ध ११०४८५ मेट्रीक टन धान्यापैकी राज्यांनी ५७४६१ मेट्रीक टन धाण्याचा वापर केला. संपूर्ण ग्रामीण स्वरोजगार योजने अंतर्गत ११००० स्वरोजगारींना मदत पुरवण्यात आली. ग्राम आवास योजने खाली ३३००० घरकुले बांधली.

*(मराठी अनुवाद : डॉ. शैलेश दळवी)*

• • •

# मिझोरामचे बांबू विकास धोरण – २००२

**पूर्वपीठिका** – बांबू हे मिझोराम राज्यातील दुर्लक्षित असे प्रमुख नैसर्गिक संसाधन आहे. मिझोराम राज्याच्या नैसर्गिक व आर्थिक सामर्थ्याचा पुरेसा वापर झालेला नाही, हे सामर्थ्य ओळखून त्याचा पुरस्कार व विकास हा मिझोरामच्या विकासासाठी व लोकांच्या भल्यासाठी झाला पाहिजे.

मिझोरामच्या जंगलातील जैवविविधतेमध्ये बांबू प्रमुख घटक आहे. पारंपरिक जीवन व जीवनपद्धती ही बांबूवर अवलंबून आहे. तसेच आधुनिक मिझो लोकांच्या सामाजिक–आर्थिक प्रगती करता देखील बांबू उपयोगी आहे. बांबू क्षेत्राचा विकास हे राज्य सरकार व केंद्र सरकारच्या दृष्टीने प्राथमिक विषय आहे. म्हणून ग्रामीण भागाच्या विकासाकरिता बांबू विकासाचा प्रचार व प्रसार करणे गरजेचे आहे.

**सामाजिक–आर्थिक स्थिती**

मिझोराम राज्याची अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेती आधारीत आहे. ज्यामध्ये झूम लागवड मोठ्या प्रमाणावर होते. राज्यामध्ये लोकांना नियमित उत्पन्न देण्यासारखे कोणत्याही प्रकारचे उद्योग नाहीत. जवळपास ५०,००० लोक सरकारी आणि निम सरकारी नोकरीत आहेत. हे प्रमाण संपूर्ण लोकसंख्येच्या ६% इतकेच आहे. १–४–१९९० रोजी संपूर्ण राज्यात ४३३४ लघुउद्योग होते. त्या व्यतिरिक्त लोक कुक्कुट पालन, वराह पालन, दुग्धव्यवसायासारखे उद्योग करतात. राज्यामध्ये १९९६–९७ साली दरडोई उत्पन्न रु. १२३६०/– इतके होते. याव्यतिरिक्त अनेक लोक कुटीर उद्योग पण करतात. जरी राज्यातील साक्षरतेचे प्रमाण (२००१ च्या जनगणनेनुसार) ८८.८४% असले तरी पायाभूत सुविधांचा अभाव, दुर्गमता, बाजाराशी तुटक–पणा, खंडीत वीज पुरवठा यांसारख्या समस्यांमुळे उद्योगांचा विकास मंद गतीने होत आहे. दुर्गम भौगोलिक परिस्थिती व फक्त ३% इतकी सपाट जमीन असल्याने आर्थिक मागासलेपणा आहे.

**बांबू संसाधनाचे दृश्यचित्र**

उच्चकटिबंधीत पानझडी वने आणि बांबूची जंगले ही सामान्यपणे मिझोराममध्ये आढळणारी वनसंपदा. उष्ण कटिबंधित सदाहरीत वनांच्या निम्न पट्ट्यात आणि पानझडी वनांमधे नदीच्या काठी बांबू उगवताना दिसतात. समुद्र सपाटीपासून ४० मीटर ते १५०० मीटर पर्यंत बांबू आढळून येतात. पण चाम्पाई सारख्या पूर्वेकडील भागात व दक्षिण पूर्वेकडे बांबूचे प्रमाण कमी आहे. मिझोराम राज्यामध्ये ६४४६ वर्ग किमी परिसरात बांबूची बेटे आहेत. म्हणजेच राज्याच्या ३१% भौगोलिक क्षेत्रात बांबूच्या २० प्रजाती आढळतात. संपूर्ण बांबूपैकी ९५% हा मौतक (Melocanna baccifra) जातीचा बांबू आहे. प्राथमिकता खाण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या बांबूच्या जातीमध्ये देखील मौतक (Melocanna baccifra) ह्या जातीचा सर्वाधिक वापर होतो.

बांबूची वार्षीक वाढ, तयार बांबू, वार्षीक उत्पन्न, वापर आणि शेतीसाठी जाळण्यात येणाऱ्या बांबूच्या बेटांमुळे नष्ट होणारा बांबू ह्या विषयी कोणत्याही प्रकारची यथार्थ माहिती राज्य सरकारकडे नाही. परंतु वन खात्याकडून करण्यात आलेल्या सर्वेक्षणा आधारे मिझोरामधील एकूण बांबू १२,९५०.७५ मे टन इतका असून, वार्षिक उत्पन्न ३२३७.६८९ मे. टन इतके होते. ह्यातील २८.३१५ मे. टन इतका बांबू घरगुती वापरात येतो, तर ३२०९.३७४ मे. टन इतका बांबू उद्योग व विक्रीकरता शिल्लक राहतो. अशा प्रकारे मिझोराम संपूर्ण

देशातील बांबूच्या १४% बांबूची गरज पूर्ण करतो.

बांबूचे जे काही काम आहे ते जिल्हा परिषद काळापासून महाल पद्धतीने केले जाते. महाल पद्धत ही नदी काठी व जंगलाच्या अंतर्गत भागात उगवणाऱ्या बांबू करता वापरतात. २० ते २३ नद्या व त्यांच्या शाखां- द्वारा ह्या बांबूचे वहन आसाम राज्याच्या करीमगंज जिल्हातील हिंदुस्थान पेपर कॉर्पोरेशन पर्यंत केले जाते. हे बांबू कटाई व वहनाचे काम करणाऱ्यांना महालदार म्हणतात.

मिझोराममध्ये बांबूला दर ४८ ते ५० वर्षांनी फुलोरा येतो. पूर्वीच्या अनुभवानुसार बांबूला फुलोरा आल्यानंतर दुष्काळ पडतो, ज्याला 'मौतम' म्हणतात. मौतम हा मौतळा जातीच्या बांबूला फुलोरा आल्यानंतर येतो. 'रावथींग' जातीच्या बांबूला फुलोरा आल्यानंतर येणाऱ्या दुष्काळाला 'थींगतम' म्हणतात. नोंदीनुसार मौतकचा फुलोरा १८१५, १८६३, १९११, १९५९ साली आला. ह्या नंतर २००७ मध्ये फुलोरा अपेक्षित आहे. बांबूला फुलोरा आला आणि बिया तयार झाल्या की उंदरांची संख्या वाढते. ही संख्या मोठ्या प्रमाणावर वाढल्याने हे उंदीर शेतातील उभी पीके खातात, ज्यामुळे अन्नधान्याचा प्रचंड तुटवडा निर्माण होतो.

## बांबू विषयक धोरणाची गरज

बांबू एक बहुउपयोगी, निसर्गास अनुकूल व मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असून, कमी प्रमाणात वापर होणारे संसाधन आहे. त्याकरता त्याचा शाश्वतपणे कसा वापर वाढवता येईल हे बघावे लागेल. मिझोराम मधील लोकांच्या आर्थिक व नैसर्गिक विकासा करिताबांबूचे फार मोठे योगदान होऊ शकते. बांबू निश्चितपणे राज्याची अर्थव्यवस्था सुधारुन अनेक लोकांना त्यापासून रोजगार मिळू शकतो.

## ध्येय व उद्दिष्ट

मिझोराममधील बांबूच्या नैसर्गिक क्षमता व आर्थिक क्षमता लक्षात घेता धोरणाची ध्येय व उद्दिष्ट पुढीलप्रमाणे आहेत.

१) डोंगर माथा व डोंगर उतारावरील बांबूचे रक्षण करणे व पुनर्उत्पादन केल्याने बांबूचे शाश्वत उत्पादन व निसर्गाचा समतोल ठेवला जाऊ ठकतो.

२) बांबू वनातील जैवविविधतेचे रक्षण व त्या बरोबर वनसंरक्षण आणि पुनर्उत्पादन क्षेत्र आणि त्यांचा भावी विकास.

३) बांबू संसाधनाचा योग्य वापर आणि शास्त्रीय व्यवस्थापनाद्वारे शाश्वत विकास.

४. खाजगी बांबू लागवड (वैयक्तिक व सामाजिक) करण्यासाठी प्रोत्साहन देणे.

५. घरगुती स्तरावर व नगदी पीक म्हणून बांबू लागवड करणे आणि वनशेतीचा एक अविभाज्य घटक म्हणून बांबू लागवडीस प्रोत्साहन देणे, जेणे करुन ग्रामीण भागातील घरगुती गरजा भागवता येतील.

६) जैवतंत्रज्ञानाच्या मदतीने बांबू लागवड व उत्पादन वाढवणे व व्यवस्थापन पद्धती सुधारणे, जेणेकरुन बांबू लागवडीने आर्थिक नफा मिळू शकेल.

७) पारंपरिक बांबू हस्तकला व पुनर्उत्थान नवीन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने करुन बाजार संलग्न विक्री व निर्यात धोरण तयार करणे.

८) बांबू विकास विभाग हा ग्राम विकासाचे प्रमुख अंग असून वन व कृषी उद्योग विभागाशी संलग्न करून राज्यामध्ये ग्रामीण उद्योजकता वाढविणे.

९) लाकडाला पर्याय म्हणून बांबू वापरण्याचा प्रसार करणे. ह्या करता बांबू आधारीत वस्तू निर्माण करणाऱ्या संस्थाना उत्तेजन देणे व त्यांचा प्रसार करणे. ज्या योगे लाकूड व पर्यायाने राज्यातील जंगलावरचा ताण कमी होईल.

१०) बांबू म्हणजे 'हिरवे सोने' ह्या संकल्पनेचा शेतकरी, व्यापारी व कारखानदार यांच्यात प्रसार करुन ग्रामीण उद्योगाचे वर्धन करण्याकरिता जागृती करणे.

११) बांबूच्या आर्थिक उत्पादन क्षमतेचा २००७ मधील मौतम येण्यापूर्वी पुरेपूर वापर करणे.

**बांबू विभाग विकासाचा दृष्टिकोन**

१) बांबू जैव विविधता, बांबू बीज यांचे संरक्षण व वनरक्षण.

२) बांबू वनांचा व बांबू पुनर्उत्पादन क्षेत्राद्वारे पेयजल स्त्रोतांचे रक्षण करणे, ज्याद्वारा मानवी वस्ती, रस्ते, ग्रामीण रस्ते व ज्यावर आधारीत विद्युत निर्माण प्रकल्प राबविणे.

३) बांबूचा झूम (स्थलांतरीत शेती) मधे होणारा नाश रोखणे व अशा शेतीच्या जमिनी तयार न करण्याकरिता ग्रामपंचायत व ग्राम विकास समिती द्वारा प्रयत्न करणे. हळूहळू लोकांना बांबू शेतीकडे वळवणे व त्याचे व्यवस्थापन शिकवणे.

४) शाश्वत व्यवस्थापन बांबू वनांचा व पुनर्उत्पादन क्षेत्रांचा त्याच कारणासाठी उपयोग करुन त्या-द्वारा बांबू पारंपरिक उपयोगासाठी व उद्योग, व्यवसाय, विक्री करता येईल.

५) जास्ती उत्पादन देणाऱ्या बांबूच्या प्रजाती वापरुन परसान व वनशेती मध्ये बांबू लागवड करुन त्याचा उपयोग उत्पन्नवाढ व बांबू आधारीत उद्योगांकरता होईल.

६) धोरणाच्या ध्येय पूर्ततेकरिता खाजगी बांबू लागवडीवर भर देणे. बाजार केंद्रीत बांबू लागवडीस प्रोत्साहान देणे.

७) व्यवसाय, संस्थाचालक आराखडा पूरवून त्या द्वारे लाभांश, सबसीडी, तांत्रिक व व्यावसाधिक मदत पुरवणे. याचबरोबर लागवडीसाठी रोपे, सुधारीत बियाणे, प्रक्रिया सुविधा, प्रशिक्षण, कर्ज सुविधा, निर्यात सुविधा पुरवणे इत्यादी मदत करता येईल.

८) निवडक बांबू प्रजाती ओळखून त्यांची लागवड व उद्योगांना लागणारा सहायक कच्चा माल पुरविणे.

## कार्यतंत्र

**वातावरण व पर्यावरणाचे रक्षण**

१) पर्यावरण व वातावरणाचे रक्षण व जतन करणे आणि सध्याचा असमतोल दूर करून नैसर्गिक साधन संपत्तीचा होणारा विद्ध्वंस थांबवणे. तपशीलवार कृति कार्यक्रम व मार्गदर्शक तत्व सप्टेंबर २००२ पर्यन्त तयार करणे.

२) बांबू वने आणि पुनर्उत्पादन क्षेत्र जी महत्वाच्या डोंगर उतारावर आणि गावाभोवती आहेत त्यांना संरक्षित करणे.

**बांबू संसाधन निर्धारण**

***आलेखन/मोजमाप***

बांबूच्या संदर्भात गोळा झालेली माहिती अत्यल्प आहे. बांबू संसाधन निर्धारण म्हणजेच बांबू संदर्भातील माहिती गोळा करणे व मोजमाप करणेचे काम युद्ध पातळीवर सुरु असून २ ते ३ वर्षात पूर्ण होईल. या करता वन सर्वेक्षण कार्यालय भारत सरकार, राष्ट्रीय दूरसंवेदन संस्था, राज्य दूर संवेदन केंद्र आणि वन व पर्यावरण विभागाची मदत घेता येईल.

### बांबू विकासाकरिता समर्पित जमिनीचा वापर

बांबूबहुल प्रदेशात ज्या ठिकाणी बांबू विकासाची क्षमता आहे व आर्थिक व वातावरणाची अनुकुलता आहे अशी ठिकाणे निवडून त्यांचा उपयोग केवळ बांबू लागवडीसाठी करावा.

### राज्यामधील बांबू संसाधनाचे व्यवस्थापन

१) बांबू एक निम्न स्तराचे उपज म्हणून सदाहरीत व अर्धहरीत वनांमध्ये नदीकाठी व वापरात नसलेल्या स्थलांतरीत शेतीत आढळतो. सध्या उपलब्ध असलेला बांबू शासकीय जमीन, स्थलांतरीत शेत जमीन, वैयक्तिक मालकी असलेल्या जमिनीत किंवा गाव मालकीच्या जमिनीत असेल तरी त्याचा अंतिम उपयोग लोकांच्या गरजा व उद्योगाच्या गरजा पाहून व्यवस्थापन करावे.

२) संरक्षीत वनक्षेत्रातील बांबू वनांचे शाश्वत पद्धतीने व्यवस्थापन करुन मान्य पध्दतीने स्थानिक ग्रामीण समाजाच्या मदतीने एकात्मिक वन संरक्षण पध्दतीने रक्षण करावे. सध्या प्रचलित 'महाल' पध्दतीची बांबू कटाई बंद करुन त्या ऐवजी अधुनिक बांबू कटाई पद्धतीचा वापर करावा.

३) शासकीय संरक्षित क्षेत्राबाहेरील बांबूचे शास्त्रीय पध्दतीने व्यवस्थापन केले पाहिजे. योग्य मार्गदर्शक तत्व ग्रामपंचायत, वन व पर्यावरण विभाग, स्थानिक विकास संस्थांच्या समन्वयात निर्माण झाली पाहिजेत. बांबूकटाई ग्राम परिषद किंवा मजूर सहकारी संस्थेकडून किंवा कुटुंबाकडून झाली पाहिजे.

४) लाभांश म्हणून आणि ग्रामपंचायती वनसंरक्षणात समावून घेण्यासाठी बांबू व्यवस्थापनामध्ये ग्राम समितीला रस निर्माण होण्यासाठी बांबू व्यवस्थापनाचे हक्क या समितीला द्यावेत. याकरता कायदे व नियम करावेत. पर्यावरण विभागाचे प्रतिनिधी ह्या समितीत द्यावेत. बांबू संसाधन व्यवस्थापन हे अशा प्रकारे ग्राम स्तरावरील उपक्रम असेल.

### आगी पासून संरक्षण

आरक्षित जंगल व गावपरिसरातील बांबू संसाधनाचे आगी व वणव्यां पासून रक्षण केले पाहिजे. दरवर्षी जंगल आगी पासून संरक्षित करण्याचे नियोजनातून धोरण आणि कृतिचा वापर करुन ग्रामपंचायत, शासकीय विभाग व सामाजिक संस्थांच्या सहयोगाने आश्वात येईल. यासाठी लागणारा निधी शासनाकडून व ग्राम परिषद निधी (बांबू विक्रीतून मिळणारा) उपलब्ध होऊ शकतो.

### बांबू कटाई हंगाम नियंत्रित करणे

१) सह परिस्थितीत बांबू कटाई अनियंमित आहे. ग्रामस्थांना त्यांच्या न्याया मागण्या व गरजांच्या पूर्ततेसाठी मोफत किंवा अल्प किंमत देऊन त्या पूर्ण करुन घेता येतात. शासकिय क्षेत्रातील बांबू महाल पद्धतीने विकला जातो. बांबू संसाधन शाश्वत पध्दतीने वापरणे आणि बांबू उत्पादनासाठी आधारभूत योजना करणे, ज्या द्वारा स्थानिक गरजा व बांबू निर्यात करता येईल. बांबूची सुधारीत उत्पादने, वार्षिक बांबू कटाई आणि उत्पन्न ह्यांचे वनसंवर्धन शास्त्र, नियमन, ऋतुनिहाय गरज, बाजाराची गरज ह्याआधारे सर्व संबंधीत क्षेत्रांच्या सल्ल्याने बांबूचे जास्तीत जास्त उत्पादन घ्यावे.

२) ज्याठिकाणी बाजाराची गरज आहे, त्या ठिकाणी स्थानिक गरजा व उद्योगांच्या गरजा लक्षात घेऊन मर्यादित बांबूची कटाई झूम क्षेत्रातून

(स्थलांतरीत शेती) करावी. (झूम – या शेतीच्या पध्दतीमध्ये स्थानिक लोक काही क्षेत्रातला बांबू जाळतात आणि त्याठिकाणी शेती करतात. काही वर्षांनी ही जागा सोडून नविन क्षेत्र तयार करतात.)

**बांबूच्या नैसर्गिक बेटांवर बांबूचे पुनर्उत्पादन**

१) बांबू पुनऊत्पादन व वाढ करणे ही बांबू बेट व मोकळ्या जागांवर समस्या येत नाही. परंतु यथा–योग्य व्यवस्थापन पध्दतीचा वापर बांबू उत्पादन व दर्जेदार बांबूकरता करणे आवश्यक अहे.

२) नैसर्गिक बांबू बेटांचे पुनर्उत्पादन व दर्जा वाढवण्याकरिता वन व कृषि विभागाकडून तांत्रिक माहितीची मदत घ्यावी.

३) मिझोराम राज्यात सापडणाऱ्या २० प्रजातीं पैकी, ५ प्रजाती वाणिज्यदृष्ट्या उपयुक्त आहेत. मौतक, फुलुरा, रावनाल, रावथीग आणि रावधींग. खाण्याकरता रावधींग, मौतक, फुलुरा, रावनाल, रावमी ह्या प्रजाती वापरतात. परंतु व्यवस्थापन आणि पुनर्उत्पादन धोरणानी नैसर्गिक बांबू बेटांवर लक्ष केंद्रित करावे लागेल.

**बांबू लागवड विकास**

१) अंदाजे २५००० हेक्टर बांबू लागवड पुढील ६ ते ७ वर्षात केली जाईल. कारण २००६–०७ मध्ये जो फुलोरा येईल त्यामध्ये बहुतेक बांबू नष्ट होईल.

२) बांबू लागवड वाढविण्याला प्रोत्साहन दिले पाहिजे. बांबूला मिळणारी किंमत, पीकाचे सातत्य, योग्य वाणाचे उत्पादन व उद्योगाच्या गरजा ह्यांना लक्षात घेऊन बांबू लागवडीस चालना द्यावी. अशा प्रजातींची लागवड शासकिय व सामाजिक मालकीच्या जमिनीवर करावी. तांत्रिक व शास्त्रीय माहितीची मदत वन व कृषी विभागाकडून घ्यावी. बांबू लागवडीस इच्छुक कुटुंबांना प्रोत्साहन भत्ता किंवा बक्षीस राज्य कृषी, वनीकरण, पर्यावरण व वनखाते, ग्राम विकास, जमीन संवर्धन विभागाकडून देता येईल. अशा इच्छुक शेतकऱ्यांना भाडे तत्त्वावर व इतर अटींवर शासकिय मालकीची जमीन जी वनक्षेत्राबाहेर आहे ती देता येईल.

३) प्रत्येक तालुक्यामध्ये बांबूच्या रोपवाटीका तयार करुन बांबू लागवडीकरिता गरज असलेली बांबू रोपे पुरवता येतील. एक केंद्रिय रोपवाटीका अशा अनेक तालुका स्तरीय रोपवाटीकांना मदत करु शकेल. आधुनिक रोपवाटीका व लागवड तंत्रज्ञानाचा वापर करुन आणि तांत्रिक माहिती पुरवून जिल्ह्यातील बांबू लागवड कार्यक्रम पार पाडता येईल. राष्ट्रीय स्तरावरील संस्था जसे कृषी विद्यापीठे, राज्य वनासंशोधन केंद्र ह्यानी दर्जेदार रोपवाटीका तयार करण्याचे काम करावे व राज्यात लागवड तंत्राचा प्रसार करावा.

४) बांबू लागवड व उत्पादन करणारे आणि बांबू उद्योजक, कलाकार ह्यांच्यामध्ये दुवा निर्माण केला पाहिजे, जेणेकरुन बांबू लागवड संपूर्ण राज्यातील व राज्याबाहेरील उद्योग व विक्रीस उपलब्ध होईल.

५) बाजार व परिवहन सुगमता बघून बांबू लागवड करण्याच्या क्षेत्रांचे निश्चितीकरण करावे.

६) बांबू देखभाल व उत्पादन संदर्भातील मार्गदर्शक तत्वांचे निर्माण पर्यावरण व वन मंत्रालयाकडून जुलै २००२ पर्यंत करावे.

**बांबू फुलोरा येण्यापूर्वी जास्तीत जास्त बांबू वापरण्याचे धोरण**

१) शक्य तेवढा जास्तीचा बांबू वापर २००६-०७ च्या मौतम पूर्वी करण्याला प्रोत्साहन दिले पाहिजे. शासकीय पध्दतीवर आधारित बांबू कटाई शासकिय जमीनीवरील व बाहेरील बांबू तसेच झूम क्षेत्रातील बांबू कटाई अत्यल्प दर देऊन करावी व ह्या बांबूचा उपयोग घर बांधकाम व इतर पारंपरिक वापरात करावा. उर्वरित बांबू निर्यात करावा.

२) बांबू कटाई व बांबू उद्योगांना मध्यम व मोठ्या कारखान्यांमध्ये प्रोत्साहीत करण्याकरिता लाभांश देण्याबद्दल नविन उद्योग धोरण २००० पर्यंत करावे.

३) घरबांधणीचे नविन तंत्रज्ञान, पायाभूत सुविधांसाठी बांबूचा वापर वाढविणे. जसे बांधकाम, रस्ते, कुंपन, जलसंधारण ह्या क्षेत्रात बांबू वापराला चालना देणे. ह्या कामात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांची मदत घ्यावी.

४) खाजगी जागेत व संयुक्त विद्यमाने बांबू लागवड वाढवून त्याद्वारा एक आधारभूत क्षेत्र तयार करणे, ज्याआधारे जिल्हा स्तरावर कच्चा माल उद्योगांना पुरवता येईल. यामुळे मौतमनंतर बांबू उद्योगाला बांबू पुरवठा व्यवस्थितपणे राहील.

५) राज्यस्तरीय उंदीर नियंत्रण कार्यक्रम तयार केलेला आहे. ज्याद्वारे मौतम काळात उंदरांवर नियंत्रण होईल.

**बांबू विक्री व्यवसाय**

बांबू व्यवस्थापन, कटाई, वापर व नैसर्गिक साधन संपत्तीचा विचार आणि राज्यसरकार द्वारा बांबू लागवडीला मिळालेली चालना या सर्वांचा परिणाम म्हणून बांबू व्यवसायाला मोठी उचल मिळेल. मौतम पूर्वी मोठ्या प्रमाणावर बांबू कटाई, बांबू उद्योगांचा विकास व लाभांश सुविधेमुळे राज्यातील व राज्याबाहेरील बांबू व्यवसाय वाढतो आहे. राज्य सरकारचे हे कर्तव्य आहे की त्यांनी बांबू व त्यापासून बनलेल्या वस्तूंचा वापर मिझो लोकांनी करावा. ह्यासाठी प्रयत्न करावेत. बांबू व्यावसायिकांचे संघटन करुन तत्यांचे संधान बांबू उत्पादक व कारागिरांबरोबर करावे, ज्या योगे बांबू विक्री व्यवसाय वाढीस लागेल. निर्यातीस प्रोत्साहन देण्याचे काम निर्यात प्रवर्तन केंद्र करेल. ह्या केंद्राची स्थापना औधोगिक धोरण २०००, मिझोराम द्वारा करण्यात आली आहे.

**बांबू उद्योग**

१) बांबू धोरणाच्या आराखड्यात लघु, मध्यम व मोठ्या उद्योगांना बांबू उद्योग सुरु करण्यासाठी प्रोत्साहित करण्याची व्यवस्था पाहिजे. सुरुवातीला हे उद्योग 'मौतक' पूर्वी मोठ्या प्रमाणावर बांबू कटाई होईल, त्यावर आधारीत असावेत. बांबू चटाई, चॉप स्टीक, बांबू कोंब, अगरबत्ती काड्या व इतर शोभीवंत वस्तू तयार करणे असे हे उद्योग असतील. मिझोराम सरकारच्या नविन औद्योगीक धोरण २००० नुसार नविन बांबू उद्योग, लाभांश व सबसीडीचे नियोजन हे उद्योग वाढविण्यास पोषक ठरेल. या बरोबरच, बांबू धोरणाद्वारे खात्रीशीर तंत्रज्ञान अंगीकरणे व त्याद्वारा बाजाराशी निगडीत व राज्याबाहेर विक्री करण्याचे प्रयोजन पाहिजे. कुटीर उद्योगांमध्ये साध्या व सोप्या निर्मिती प्रक्रियांचा वापर करण्याबरोबरच मध्यम व मोठ्या उद्योगांकरीता दर्जेदार उत्पादने बनविण्यासाठी बाहेर तंत्रज्ञान मागवावे. राज्यात व राज्याबाहेरील लाकडी वस्तू तयार करण्यासाठी लाकडाला पर्याय म्हणून बांबू चटई व बांबू प्लाय वापर वाढवायला हवा. ह्यामुळे बांबूचा दर्जा व किंमत

वाढण्याबरोबरच लाकडाचा वापर कमी होईल. शासकीय बांधकामामध्ये बांबूचा वापर शक्यतेवढा जास्ती प्रमाणावर करावा.

२) बांबूचे इतर औधोगिक उपयोग बांबूची जमीन, बांबू कोंब आणि बांबूचे फर्निचर हे लाकडाला पर्यायी म्हणून वापरता येईल. ह्या क्षेत्राला प्रगत तंत्रज्ञान, संकल्प चित्र आणि शोभीवंत वस्तू ह्यांची गरज आहे व त्याला वाव दिला पाहिजे. तज्ञांचे मार्गदर्शन घेऊन योग्य तंत्रज्ञान आणि कलाकारांना मार्गदर्शन, बांबू उद्योगांना प्रोत्साहन देण्याचे काम राज्य उद्योग विभागाने करावे.

३) जास्त किंमतीच्या वस्तूंचे प्रभावी व योग्य निर्माण, बाजार व निर्यात संबंध जुळवणे. या धोरणाद्वारे परकिय गुंतवणूक व उद्योजकता तंत्रज्ञान, आर्थिक व निर्यातसंबंधी दुवा निर्माण केला पाहिजे. ह्या नियोजनाने स्थानिक व्यापाऱ्यांकडून संसाधनांचा योग्य वापर होईल. राज्याला चांगल्या परकीय चलनाची मिळकत होईल.

**उद्योजकता विकास**

लोकांच्या संघटीत व स्वयंसेवी स्फूर्तीने घेतलेल्या सहभागातून उद्योजकता विकासास प्रोत्साहन देता येईल. शासनाने उद्योजकता विकास सुकर होण्यासाठी शिक्षण व प्रशिक्षण, गट तयार करणे, निधीपुरवठा, कर्ज पुरवठा, भाडेतत्त्वावर जमीन देणे ह्या सर्व सुविधा लोकसहभागातून व त्यांना व्यवस्थापन समितीत सहभागी करून द्यावे.

**बाजार माहिती प्रसार**

सध्या उपलब्ध बाजार राज्यातील व राज्याबाहेरील बांबू उत्पादन, उद्योजक इ. माहिती पुस्तके, प्रसार माध्यमातून देता येईल.

**संशोधन व विकास**

बांबू क्षेत्र विकासाकरिता व दर्जा, उत्पादन, वस्तूंच्या किमती शाश्वत व्यवस्थापन, बीज साठवन व विविध उत्पादनांना मदत करण्यासाठी संशोधन करण्याकरता राष्ट्रीय बांबू विकास केंद्राची मदत घेता येईल.

मानव संसाधन विकास, बांबू संसाधन विकास करण्याकरता प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करणे गरजेचे आहे. उच्च उत्पादन क्षमता असणारी रोपे शेतकऱ्यांना पुरविणे, बांबू कटाई, व्यवस्थापन, उद्योग, कारखान्यात बांबूच्या वस्तू तयार करणे, निर्यात, विपनन ह्यासारख्या क्षेत्रांमध्ये लोकांना प्रशिक्षित करणे.

**संस्थात्मक व्यवस्था**

**१) राज्यस्तरीय बांबू समन्वय समिती**

बांबू धोरण आणि बांबू विकास कार्यक्रम हे विविध विकास विभागांच्या मदतीने राज्यात राबविले पाहिजेत. ह्याकरता हे कार्यक्रम राबविताना एखाद्या उच्च स्तरीय समितीचे गठन मुख्य सचिवांच्या अध्यक्षते-खाली करावे. राज्यस्तरीय बांबू विकास समन्वय समितीचे गठन आयुक्त, सचिव आणि विभाग प्रमुख व व्यापार, अर्थ, उद्योग, बँक, स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींच्या सहयोगाने करावे. ह्यांच्या मदतीने बांबू विकास कार्यक्रम राबवावा.

**२) राज्य बांबू विकास एजन्सी**

विभागनिहाय उपलब्ध निधी वापर व अंमलबजावणी आणि विशेष अनुदान सौकार्यार्थ आणि बांबू उद्योग, कला कौशल्य, प्रशिक्षण व मानवसंसाधन विकास, बांबू लागवड यासाठी बांबू विकास अधिकरण स्थापन करण्यात येईल. यामध्ये विविध-विभागातील तज्ञांचा अंतर्भाव करावा. ह्या समितीने राज्यस्तरीय

(पृष्ठ क्र. ११ वर पहा)